cmyk

## संपादकीय

### अवकाळीचा कहर

राज्यातील विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक भागांना अवकाळी पाऊस व गारपिटीने दिलेला दणका म्हणजे दुष्काळात तेरावाच ठरला आहे. मागील हंगामात महाराष्ट्रासह संपूर्ण देशात दमदार पावसाची नोंद झाली होती. काही जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाल्याने ओल्या दुष्काळाचा सामना करावा लागला, तर काही भागांत पिकांना मुबलक पाणी मिळाल्याने उत्पादनाबाबत आशादायी चित्र निर्माण झाले होते. खरीपाइतकाच रब्बी हंगाम शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असतो.

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-३०० | गुरूवार दि.२६ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# गारपीट-अवकाळी पावसाने मराठवाडा-विदर्भ हादरला

## ३७,८५८ हेक्टर पिकांचे नुकसान, तातडीच्या पंचनाम्यांचे आश्वासन

मुंबई । प्रतिनिधी

**मराठवाडा आणि विदर्भात वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला असून प्राथमिक अंदाजानुसार बीड, लातूर, परभणी, नांदेड, धाराशिव तसेच यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यांतील सुमारे ३७ हजार ८५८ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करून पंचनामे केले जातील, असे आश्वासन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे.**

अवकाळी पावसामुळे गहू आणि ज्वारीची पिके आडवी पडली, तर काढून ठेवलेला हरभरा भिजल्याने नुकसान अधिक वाढले आहे. द्राक्षबागांना मोठा फटका बसला असून भाजीपाल्याचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तसेच आंब्याचा मोहोर झडल्याने बागायतदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. नुकसानग्रस्त भागातील शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यासाठी महसूल व कृषी विभागामार्फत संयुक्त सर्वेक्षण करून अहवाल शासनाकडे सादर केला जाणार आहे. ३३ टक्क्यांहून अधिक नुकसान झाल्यास शासनाकडून आर्थिक मदत देण्यासाठी निधीची मागणी केली जाईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, विविध भागातील आमदारांनी नुकसानग्रस्त



शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक सहाय्य देण्याची मागणी केली आहे. भाजप आमदार अभिमन्यू पवार यांनीही शेतकऱ्यांना त्वरित मदत देण्याची आवश्यकता अधोरेखित केली. राज्यात रविवार, सोमवार आणि मंगळवारी अनेक भागांत वादळी पाऊस व गारपीट झाली. यामुळे उभ्या आणि काढणीच्या टप्प्यातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाने स्पष्ट केले की, नुकसान झालेल्या मंडळांमध्ये पीक कापणी प्रयोगातून उत्पादन उंबरठ्यापेक्षा कमी आढळल्यास संबंधित शेतकरी पीकविमा भरपाईस पात्र ठरतील आणि नियमांनुसार त्यांना विमा मदत दिली जाईल. अचानक झालेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे आधीच आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांसमोर ▶▶ पान २ वर

# नऊ शेतकऱ्यांनी किडन्या विकल्या!

मुंबई । प्रतिनिधी

**सोलापूर आणि चंद्रपूरमध्ये खासगी सावकारांच्या जाचाला कंटाळून शेतक-यांनी कम्बोडिया आणि तामिळनाडूत जाऊन किडन्या विकल्याची धक्कादायक माहिती विधानसभेत एका प्रश्नामुळे पुढे आली. या प्रश्नाला मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या लेखी उत्तरात चंद्रपूर जिल्ह्यातील एका शेतक-याने खासगी सावकाराच्या तगाद्यामुळे कम्बोडिया येथे जाऊन ८ लाख रुपयांना किडनी विकली व कर्ज फेडले. पोलिस तपासात यातील मध्यस्थाने स्वत:सह ९ व्यक्तींच्या किडन्या कम्बोडिया आणि तामिळनाडूतील स्टार किम्स हॉस्पिटल येथे विकल्याचे समोर आल्याची धक्कादायक माहिती दिली**

या प्रकरणात सावकारी करणा-या ६ आरोपींबरोबरच किडनी खरेदी-विक्रीत सहभागी असणा-या अन्य ५ जणांना आरोपी करण्यात आले आहे. यापैकी ८ जणांना अटक करण्यात आली आहे. यातील एका आरोपीला फरार घोषित केले असून त्याचा शोध सुरू आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.काँग्रेसचे ज्येष्ठ सदस्य नितीन राऊत, भाजपचे अतुल भातखळकर व अन्य सदस्यांनी राज्यात सावकारी कर्जाच्या परतफेडीसाठी शेतक-यांना किडनी विकावी लागत असून किडनी विक्रीचे रॅकेट तामिळनाडू येथील तिरूचिरापल्ली येथील एका हॉस्पिटलद्वारे चालविले जात आहे. या प्रकरणात आंतरराज्य व आंतरराष्ट्रीय मानवी अवयव तस्करीचे जाळे कार्यरत असल्याबाबत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता.हा प्रश्न चर्चेला आला नाही; पण प्रश्नाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या लेखी उत्तरात धक्कादायक माहिती पुढे आली. रोशन सदाशिव कुडे या चंद्रपूर जिल्ह्यातील दुधाचा ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### भाजप-सेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा

छ. संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुका अंतर्गत अंभई गावात काल मध्यरात्री दोन गट आमने-सामने येत तुफान राडा झाल्याची घटना समोर आली आहे. बक-यांच्या व्यवहारातून वाद उफाळल्याने दोन गटांत मारामारी झाली असून या हाणामारीत ५ ते ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. तसेच पोलिसांनी तातडीने कारवाई करून १५ जणांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला आहे. बक-यांच्या व्यवहारातून सुरू झालेला वाद हळूहळू चिघळला आणि त्यानंतर दोन्ही गटांमध्ये जोरदार घोषणाबाजी व दगडफेक झाली.

### रमजानमुळे खजुराची मागणी वाढली

मुंबई : रमजान महिन्यात रोजा सोडताना खजूर खाण्याची परंपरा असल्यामुळे खजुराच्या विक्रीत मोठी वाढ झाली आहे. यामुळे खजुराच्या किमतीतही १५ टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवली जात आहे. सर्वसामान्य नागरिकांना परवडणा-या बहरी प्रकारच्या खजुराला विशेष मागणी आहे. ६५ रुपये किलो दराने मिळणारा साधा खजूर सध्या ८० रुपये किलो दराने विकला जात आहे.रमजानचा महिना असल्याने बाजारात विविध प्रकारचे खजूर उपलब्ध झाले आहेत. यामध्ये १५० रुपये किलो दराचा बहरी आणि ३०० रुपये किलो दराचा खजूर पसंतीस उतरत आहे.

### ऑर्केस्ट्रा बारना कायमचे टाळे ठोकणार

मुंबई : राज्यात डान्सबारना परवानगीच नाही. केवळ ऑर्केस्ट्रा बारना परवानगी आहे. मात्र या ऑर्केस्ट्रा बारच्या नावाखाली गैरप्रकार सुरू असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे वारंवार नियमांचे उल्लंघन करणा-या बारचा परवाना कायमचाच रद्द करण्यात येणार आहे. त्यासंदर्भातील कायद्यातील दुरूस्ती याच अधिवेशनात किंवा पुढील अधिवेशनात करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत केली.ऑर्केस्ट्रा बार आणि डान्स बारविरुध्द कारवाई करण्याबाबत उद्धव सेनेचे मनोज जामसुतकर यांनी विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता.

# आयुर्वेद उपचारासाठी वनौषधी वनस्पतींचे जतन व संवर्धन होणे आवश्यक-राष्ट्रपती

शेगांव । प्रतिनिधी

**मन व शरीर स्वस्थ असले तरच उत्तम नागरिक व पर्यायाने सशक्त देश निर्माण होतो. यासाठी भारतीय प्राकृतिक उपचार पध्दतीचा वारसा असलेल्या आयुर्वेदाला विकसित करा व वनौषधींचे जतन संवर्धन करा, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुधवारी (दि.२५) शेगांव येथे आयोजित 'आयुष राष्ट्रीय आरोग्य मेळाव्या'चे उद्घाटन प्रसंगी केले.**

या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित असलेले 'आयुष'चे वैद्य व विद्यार्थ्यांना संबंधित करताना राष्ट्रपती पुढे म्हणाल्या की, सर्वांना परवडणारी आयुर्वेद उपचार पध्दती ही ऋषीमुनींनी शोधलेली



मोठी ठेव आहे. आपल्या स्वयंपाकातील अनेक घटक हे आयुर्वेद उपचारांचेच मूळ आहेत. सद्यस्थितीत अनेक कारणांनी वनक्षेत्र घटत ▶▶ पान २ वर

# २५ हजार शिक्षकांच्या नोकरीवर टांगती तलवार?

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण क्षेत्रातील एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरही राज्यातील मराठी शाळांचे अस्तित्वच सध्या धोक्यात असल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे. पटसंख्या कमी असल्याच्या कारणावरून राज्यातील २५५ मराठी शाळा बंद करण्यात आल्याची माहिती सरकारकडून देण्यात आली आहे. राज्यातील २५ हजार शिक्षकांच्या नोकरीवर टांगती तलवार आहे. ▶▶ पान २ वर



# राज्यसभेसाठी भाजपच्या यादीत प्रीतम मुंडेसह १० नेत्याची नावे

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यसभेसाठी भाजपच्या उमेदवारांची नावे ठरली असल्याची माहिती समोर आली आहे. मंगळवारी रात्री झालेल्या भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीत १० ते १२ जणांच्या नावावर चर्चा करण्यात आली.**

डॉ प्रीतम मुंडे रामदास आठवले विनोद तावडेंसह नेत्याची नावे आहेत 'वर्षा' बंगल्यावर भाजपच्या कोअर कमिटीची रात्री बैठक पार पडली. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री पंकजा मुंडे, आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्यासह १२ प्रमुख नेते उपस्थित होते.







भाजपच्या कोअर कमिटीची बैठक मंगळवारी रात्री पार पडली. या बैठकीमध्ये अनेक नेत्यांच्या नावांवर चर्चा झाली. राज्यसभेसाठी विनोद तावडे, ▶▶ पान २ वर

# अनिल अंबानींना ईडीचा दणका!

## ३७१६ कोटींच्या आलिशान घरावर टाच

मुंबई । प्रतिनिधी

सक्तवसुली संचलनालयानं ( ईडी ) मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात रिलायन्स समूहाचे चेअरमन अनिल अंबानी यांना मोठा दणका दिला आहे. ईडीनं अनिल अंबानी यांच्या मालकीच्या मुंबईतील १७ मजली आलिशान निवासस्थानावर टाच आणली आहे. अंबानी यांच्या मालकीच्या 'अबोड'वर जप्तीची कारवाई झाली आहे. या घराचं मूल्य तब्बल ३ हजार ७१६ कोटी रुपये आहे.

अनिल अंबानी यांच्या समूहातील रिलायन्स कम्युनिकेशन्सशी संबंधित बँक फसवणूक प्रकरणात ईडीनं कारवाई केली आहे. उच्चपदस्थ सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईच्या पाली हिल परिसरात असलेल्या आलिशान इमारतीवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. पीएमएलएच्या अंतर्गत ही कारवाई करण्यात आलेली आहे. या कारवाईमुळे जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांचं एकूण मूल्य १५,७०० कोटी रुपयांवर पोहोचलं आहे.६६ वर्षीय अनिल अंबानी यांची या प्रकरणात दुसऱ्यांदा चौकशी होण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीनं ईडीची तयारी सुरु केली आहे. ऑगस्ट २०२५ मध्ये अनिल अंबानी पहिल्यांदा ईडीसमोर हजर झाले होते. तिथे पीएमएलएच्या अंतर्गत त्यांचा जबाब नोंदवण्यात आला. आर कॉममधील कथित आर्थिक अनियमितता आणि कर्जातील हेराफेरी प्रकरणात ईडीनं अनिल अंबानी यांच्या मालकीच्या आलिशान ▶▶ पान २ वर

# दादांची बारामती सुनेत्राताईंच्या हाती

## पोटनिवडणुकीसाठी माविआ कडून देखील लवकरच बैठक

पुणे । प्रतिनिधी

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीची तयारी निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बारामती पोटनिवडणूक लढवणार असल्याची माहिती आता समोर आली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत पोटनिवडणूक लढण्यावर सर्वांचं एकमत झालं आहे. त्यामुळे कोणत्याही क्षणी निवडणुकीची घोषणा होणार आहे.

आगामी राज्यसभा निवडणुकीत पार्थ पवार हे राष्ट्रवादी ▶▶ पान २ वर

# राज्यसभेसाठी शरद पवार पुन्हा केंद्रस्थानी

मुंबई । प्रतिनिधी

राज्यसभेच्या ३७ जागा रिक्त होत असून त्यातील ७ जागा महाराष्ट्रातील आहेत. यातील ३ जागा महायुतीच्या आणि ४ जागा महाविकास आघाडीच्या आहेत. पण महायुतीकडे असलेलं आताचं संख्याबळ पाहता ७ पैकी ६ जागा त्यांना सहज जिंकता येतील. तर दुसरीकडे महाविकास आघाडी एकत्र राहिली आणि त्यांनी समन्वय राखला तर त्यांना १ जागा जिंकता येईल.पण पुरेश्या संख्याबळाचा दुसऱ्या पसंतीच्या मतावर भर असल्याने पुन्हा एकदा शरद पवार केंद्र स्थानी असल्याने ऐनवेळी काय जादू करतात याकडे सर्वांचे लक्ष आहे.



राष्ट्रवादी शपचे अध्यक्ष शरद पवार, फौजिया खान, शिवसेना उबाठाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी, काँग्रेसच्या खासदार रजनी पाटील यांचा राज्यसभेचा कार्यकाळ २ एप्रिलला संपेल. १६ मार्चला राज्यसभेची निवडणूक होणार आहे. शरद पवार यांच्यासाठी त्यांच्या ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२५ फेब्रुवारी २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ११९.०० क्विंटल | १,९४५ | २,९५१ | २,३६४ |
| ज्वारी/हायब्रिड :५५.५० क्विंटल | १,६५० | ४,५५१ | ३,२३५ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १५.०० क्विंटल | ६,६५० | ७,६७१ | ७,३४१ |
| उडीद : १.५० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| बाजरी: ३१.०० क्विंटल | २,११० | ३,२०१ | २,७१६ |
| मुग: १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| सोयाबीन: १४.५० क्विंटल | ५,२५० | ५,२५० | ५,२५० |
| हरभरा: ४२.०० क्विंटल | ४,९०० | ५,१४० | ५,००८ |

# मराठवाड्यात ५ लाख ३१ हजार एकल महिला

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

**मराठवाडा विभागात एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी विशेष उपक्रम सुरू केला आहे. विभागातील एकल महिलांची अचूक संख्या निश्चित करण्यासाठी सर्व आठ जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्वेक्षणात ४ लाख ९३ हजार ४५० एकल महिला आढळून आल्या आहेत. नागरी भागातील एकल महिलांचे सविस्तर सर्वेक्षण करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. या सक्षमीकरण कार्यक्रमासाठी विभागीय महिला व बाल विकास उपायुक्त यांची विभागीय नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**


विभागातील एकल महिलांमध्ये विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता तसेच ४० वर्षांपुढील अविवाहित महिलांचा समावेश आहे. या महिलांचे प्रश्न गंभीर असून प्रशासनाच्या माध्यमातून त्यांचे निराकरण करण्यासाठी त्यांच्या संख्येचे अचूक आकलन व्हावे, यासाठी हे सर्वेक्षण करण्यात आले आहे. जिल्हा परिषदांमार्फत अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून



हे सर्वेक्षण करण्यात आले असून आठ जिल्ह्यांतील ग्रामीण भागात ४ लाख ९३ हजार ४५० महिलांची नोंद झाली आहे. सर्वेक्षणाच्या विश्लेषणानुसार विधवा महिलांची संख्या सर्वाधिक आहे. एकूण विधवा महिला ४ लाख ८४ हजार ६३७ आहेत. घटस्फोटीत महिलांची संख्या १४ हजार ४६३, परित्यक्ता महिलांची संख्या २१ हजार १४२, तर ४० वर्षांपुढील अविवाहित महिलांची संख्या १६ हजार ६३७ आहे. वयोगटानुसार केलेल्या विश्लेषणात १८ ते ३० वयोगटातील ३२ हजार ९६६ महिला, ३१ ते ५० वयोगटातील १ लाख ३९ हजार ७६२ महिला असून या दोन्ही गटांचे प्रमाण सुमारे ३२ टक्के आहे. ५१ ते ६५ वयोगटातील १ लाख ६४ हजार ८१८ ▶▶ पान २ वर

# भीषण अपघात, पाच जणांचा जागीच मृत्यू

अहिल्यानगर । प्रतिनिधी



जिल्ह्यातील श्रीरामपूर संगमनेर रस्त्यावर भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा गावाजवळ कार आणि मालवाहू ट्रकचा अपघात झाला आहे. कारमधील पाच प्रवाशांचा जागीच मृत्यू तर दोनजण गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. मृतांमध्ये दोन महिला, एक पुरुष आणि दोन लहान बालकांचा समावेश आहे. या भीषण अपघातात श्रीरामपूर येथील एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाला आहे.

cmyk

अग्रलेख

# अवकाळीचा कहर : बदलत्या हवामानात शेती वाचवण्याची गरज

राज्यातील विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक भागांना अवकाळी पाऊस व गारपिटीने दिलेला दणका म्हणजे दुष्काळात तेरावाच ठरला आहे. मागील हंगामात महाराष्ट्रासह संपूर्ण देशात दमदार पावसाची नोंद झाली होती. काही जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाल्याने ओल्या दुष्काळाचा सामना करावा लागला, तर काही भागांत पिकांना मुबलक पाणी मिळाल्याने उत्पादनाबाबत आशादायी चित्र निर्माण झाले होते. खरीपाइतकाच रब्बी हंगाम शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असतो. या हंगामात गहू, हरभरा, ज्वारी, मका, करडई, तसेच भाजीपाला व फळबागांची लागवड करून शेतकरी वर्षभराच्या उत्पन्नाची अपेक्षा ठेवतो. मात्र, यंदाच्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास हिरावून घेतल्याचे वेदनादायक वास्तव समोर आले आहे.

विदर्भ आणि मराठवाडा हे राज्यातील प्रमुख कृषी पट्टे मानले जातात. या भागांत मोठ्या प्रमाणावर हरभरा, गहू, मका आणि ज्वारीची लागवड केली जाते. विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, यवतमाळ यांसारख्या जिल्ह्यांमध्ये हरभरा काढणीच्या उंबरठ्यावर होता. मात्र, अचानक झालेल्या पावसाने आणि गारपिटीने हे पीक अक्षरशः मातीमोल केले. गव्हाचे कणसे जमिनीवर पडली, मक्याची झाडे कोसळली आणि अनेक शेतांमध्ये उभे पीक पूर्णपणे नष्ट झाले. शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज, केलेला खर्च आणि वर्षभराची अपेक्षा एका रात्रीत उद्ध्वस्त झाल्याची भावना या भागात तीव्र आहे.

मराठवाड्यातील परिस्थितीही वेगळी नाही. दुष्काळ हा या प्रदेशाच्या पाचवीलाच पुजलेला असला, तरी मधल्या काळात कोरड्या दुष्काळानंतर ओल्या दुष्काळाने आणि आता अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची कोंडी केली आहे. परभणी, बीड, नांदेड यांसारख्या जिल्ह्यांमध्ये ज्वारी, गहू, हरभरा, करडई यांसह कांदा, भाजीपाला आणि टरबूज-खरबूज यांसारख्या नगदी पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः कांदा उत्पादकांना आधीच दरघटीचा फटका बसलेला असताना अवकाळी पावसाने उरलेसुरले पीकही खराब केले. यामुळे आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे.

कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हे आंबा आणि काजू उत्पादनासाठी प्रसिद्ध आहेत. यंदा या दोन्ही पिकांना मुबलक मोहोर आला होता आणि विक्रमी उत्पादनाची आशा निर्माण झाली होती. मात्र, आधी ढगाळ वातावरण आणि नंतर अवकाळी पावसामुळे मोहोर गळून पडला. परिणामी, आंबा आणि काजू उत्पादकांची मोठी निराशा झाली आहे. राज्यातील काही भागांत द्राक्षबागांनाही पावसाचा फटका बसल्याचे वृत्त आहे. फळबागांसाठी हवामानातील अचानक बदल अत्यंत घातक ठरतो, कारण एकदा नुकसान झाले तर त्याची भरपाई करण्यास अनेक वर्षे लागतात.

शेती हा आधीच बेभरवशाचा व्यवसाय मानला जातो. बदलत्या हवामानामुळे ही अनिश्चितता अधिकच वाढली आहे. शेतकरी हवामानाशी झुंज देत मेहनत करतो, कर्ज काढतो, पीक उभे करतो; परंतु निसर्गाच्या एका अवकृपेने सर्व काही उद्ध्वस्त होते. ही स्थिती कायम राहिली, तर शेती करण्याची मानसिकता आणि आर्थिक क्षमता दोन्ही कमी होण्याचा धोका आहे. आधीच गेल्या तीन दशकांत अनेकांनी शेती सोडली आहे. ही प्रवृत्ती वाढली, तर अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

यामागे हवामान बदल हा महत्त्वाचा घटक असल्याचे स्पष्ट दिसते. पारंपरिक मान्सूनचे वेळापत्रक ढासळताना दिसत आहे. एरवी मे महिना कडक उन्हाळ्याचा मानला जातो, परंतु अलीकडील काळात या महिन्यातही मुसळधार पाऊस होत आहे. जानेवारी-फेब्रुवारीत गारपीट आणि अवकाळी पावसाच्या घटना वाढल्या आहेत. याचा शेतीच्या नियोजनावर थेट परिणाम होत आहे. ग्लोबल वॉर्मिंग, वृक्षतोड, जलस्रोतांचा ऱ्हास आणि पर्यावरणीय असंतुलन यामुळे हवामानातील अनिश्चितता वाढत असल्याचे तज्ञ सांगतात.

या पार्श्वभूमीवर हवामान तज्ञ, कृषितज्ञ आणि शासन यांनी एकत्रितपणे व्यापक अभ्यास करणे आवश्यक आहे. बदलत्या हवामानानुसार पीक पद्धतीत बदल, हवामानसहिष्णू बियाण्यांचा वापर, जलसंवर्धन, सूक्ष्म सिंचन यांसारख्या उपाययोजना राबवणे काळाची गरज आहे. त्याचबरोबर नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत देणे अत्यावश्यक आहे. पीकविमा योजनांतील अडथळे दूर करून नुकसानभरपाई वेळेत मिळेल, याची हमी सरकारने द्यावी.

कृषी क्षेत्र हे देशाच्या अर्थव्यवस्थेचे आणि अन्नसाखळीचे मूलभूत आधारस्तंभ आहे. शेती टिकली तरच समाज टिकेल. त्यामुळे शेतीपूरक धोरणे, पर्यावरण संवर्धन, जलसंधारण आणि हवामान बदलाला तोंड देणारी दीर्घकालीन रणनीती तयार करणे ही शासन आणि समाज दोघांचीही सामूहिक जबाबदारी आहे. अन्यथा, अवकाळी पावसाचा हा कहर केवळ एका हंगामापुरता मर्यादित राहणार नाही, तर शेतीच्या भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण करेल.

# सुप्रसिध्द डॉ.जगदीश टेकाळे मानसोपचार तज्ञ आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध

बीड । प्रतिनिधी

आपल्या बीड शहरामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिध्द मानसोपचार तज्ञ डॉ.जगदीश टेकाळे हे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी खालील आजाराचे निदान करण्यासाठी उपलब्ध रहात आहेत.



१) डोकेदुखी/अती चिंता व काळजी (सतत टेन्शन,घाबरटपणा, घाम सुटणे,थरकाम सुटणे,हाता पायांना मुंग्या येणे)२) नैराश्य/उदासिनता (मनात सतत एक सारके विचार येत राहणे, सतत शंका व्यक्त करणे,अंधारात स्वतःला कोंडून घेणे)३) झोपेच्या समस्या (झोप न येणे, झोपेत चालणे,बडबड करणे,चक्कर येणे, दातखिळी बसणे)४) व्यसनाधिनता (दारु,तंबाखू,गुटखा,मोबाईल गेम,गांजा,चरस,भांग व इत्यादी तत्सम प्रकारच्या व्यसनापासुन मुक्ती)५) बालकांच्या समस्या (झोपेत लघवी करणे, हठ्ठीपणा, चिडचिड पणा,अभ्यासात कमी,अति चंचलता, मतिमंदता, वागणुकीतील बदल, शैक्षणिक समस्या)६) स्मृती भंग (विसरभोळेपणा)७) लैंगिक समस्या (लवकर वीर्य पतन होणे, सेक्सची इच्छा न होणे, कमजोरी, स्वप्न दोष,कमी ताठरता,)८) स्क्रिझेफ्रेनिया व इतर मानसिक समस्या ९) मानसिक आजार १०) विसर पडण्याचा आजार११) मानसिक आजारावरील उपचार (संशय घेणे, भुतबाधा, भास होणे, करणी, वेडेपणा इत्यादी)१२)उदासिनता (घबराहट,भिती, आत्महत्येचे विचार, ऐकटेपणा,व्यक्तिमत्व आजार, डोके दुखी व बऱ्याच दिवसापासून होणारी अंगदुखी,सतत चक्कर येणे,एकच विचार, एकच कृती वारंवार करणे.१३) म्हतारपणातील आजार (स्मृतीभ्रंष, निद्रानाष, वेडेपणा,ऐकाकीपणा)१४) समुपदेशन (वैवाहिक व कौटुंबिक कलह, करिअर, अभ्यास, प्रेमभंग इत्यादी)१५) समुपदेशन/कौन्सेलिंग/थेरपी १६) ताणतणाव नियोजन १७) राग/संताप नियोजन १८) अभ्यास मार्गदर्शन १९) मनोलैंगिक समस्या : लैंगिक कमजोरी, शीघ्रपतन, स्वप्नदोष,लैंगिक समाधान, इच्छेचा अभाव, २०) नैराश्य, उदासपणा, मानसिक ताणतणाव, आत्महत्तेचे विचार २१) मनात एकच विचार/शका वारंवार येणे, वारंवार एकच कृती करणे २२) वयसकर माणसांच्या विसरण्याची सवय २३) सर्व तपासण्या/रिपोर्ट नॉर्मल असूनही सतत शारिरिक त्रास होणे. २४) आपल्याला काहीतरी गंभीर आजार असेल किंवा होईल याची भिती वाटणे. २५) झोपेच्या समस्या, सतत चिंता काळजी, जुनाट डोकेदुखी, दातखिळी बसणे. २६) असंबंध बडबड, भिती संशय, भास होणे. २७) लहान मुलांच्या समस्या : अभ्यासात लक्ष नसणे, हट्टीपणा, अतिचंचलता, झोपेत लघवी होणे, मतिमंद मुलांच्या वर्तणुकीच्या समस्या. २८) व्यसनांच्या समस्या : दारु, सिगारेट, तंबाखू, गुटखा, मावा, इ.२९) व्यसनमुक्ती/नशामुक्ती वरील उपचार साठी डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# बीडमध्ये लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांचा एल्गार

## जय महाराष्ट्र शासकीय-निमशासकीय अधिकारी, कर्मचारी संघटनेच्या पुढाकारातून धरणे आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

**राज्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये कार्यरत लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मंगळवारी (दि.२४) बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी राज्य संघटनेच्या मार्गदर्शनाखाली बीड शाखेच्यावतीने आयोजित धरणे आंदोलनात जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**



लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या गेल्या अनेक वर्षांपासून शासन दरबारी प्रलंबित असल्याने वारंवार निवेदने व पाठपुरावा करूनही निर्णय होत नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. आंदोलनादरम्यान कर्मचाऱ्यांनी वेतन त्रुटी तात्काळ दूर करून योग्य वेतनश्रेणी लागू करावी, पदोन्नती प्रक्रियेला गती देऊन वरिष्ठतेनुसार न्याय द्यावा, रिक्त पदे तातडीने भरावीत, समान कामासाठी समान वेतन लागू करावे, सेवा अटी व नियमांमध्ये सुधारणा करावी तसेच प्रलंबित भत्ते व देयके तातडीने अदा करावीत, अशा प्रमुख मागण्या मांडल्या. यावेळी कर्मचाऱ्यांनी आपापल्या कार्यालय प्रमुखांना सामूहिक निवेदने सादर केली. मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्यास असहकार आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. अतिरिक्त कामांना नकार देणे तसेच कामकाजावर मर्यादा आणणे अशा टप्प्याटप्प्याने आंदोलन करण्याचा निर्णय कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला. दरम्यान, महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन, डीएनई १३६ संघटनेच्यावतीने जिल्हाध्यक्ष मधुकर शेळके यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या राज्य महिला संपर्क प्रमुख जनाबाई गोसावी, जिल्हा पालक अध्यक्ष श्रीरंग धन्वे, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर आगळे, जिल्हा कार्याध्यक्ष महादेव सोनवळकर, कोषाध्यक्ष खंडोजी गोरे, सचिव दिपक जाधव यांच्यासह पदाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पान १ वरून...

### गारपीट-अवकाळी पावसाने

नव्या अडचणी उभ्या राहिल्या असून, पंचनामे आणि मदतीच्या प्रक्रियेची अंमलबजावणी किती जलद होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्यातील विशेषता मराठवाड्यातील शेतकरी सातत्याने संकटात सापडत आला आहे. संकटांची ही मालिका थांबताना दिसतच नाही. खरिपाच्या सुरुवातीला चांगला पाऊस पडला त्यानंतर शेतकऱ्यांनी पेरणी केली मात्र अतिवृष्टी सुरू झाली आणि मोठे नुकसान झाले. त्यातूनही जे पीक हाती आले त्याला उत्पादन खर्च एवढा सुद्धा भाव मिळाला नाही. एकीकडे भाव मिळावा यासाठी शेतकरी आंदोलन करीत गेले तर दुसरीकडे रब्बीची तयारी झाली. रब्बी मध्ये नुकसान भरून काढू असे शेतकऱ्यांना वाटत होते मात्र रब्बीतील पिकांना योग्य भाव मिळालाच नाही. ज्या पिकावर आशा होती अशा कापसाचे भाव नंतरच्या काळात वाढले ज्याचा फायदा शेतकऱ्यांना नाहीतर व्यापाऱ्यांना झाला. त्यातूनही रब्बीतील काही पिके आणि उन्हाळी पिके यावर शेतकरी तग धरून होते मात्र मागच्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसाने त्याचेही मोठे नुकसान झाले आहे. आता सरकारी मदत कधी येते याची प्रतीक्षा शेतकऱ्यांना आहे मात्र सध्या तरी शेतकऱ्यांच्या पदरात काहीच नसल्याचे दिसत आहे. एकूण काय की शेतकरी पूर्णपणे आजही संकटात असून, केंद्र शासनाचे धोरण आणि पीक याबाबत मोठी तफावत स्पष्टपणे दिसत आहे. यामुळेच सध्या झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे व्हावे आणि शेतकऱ्यांना ताबडतोब मदत मिळावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

-------------

### नऊ शेतकऱ्यांनी

व्यापार करणा-या अल्प भूधारक शेतक-याने खासगी सावकाराच्या जाचाला कंटाळून शेतक-याने कम्बोडियामध्ये जाऊन किडनी विकली. हे किडनी रॅकेट तामिळनाडू येथील तिरूचिरापल्ली (तिरूची) येथील एका हॉस्पिटलव्दारे चालवले जात असल्याबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर मुख्यमंत्र्यांनी लेखी उत्तर दिले.

---------------

### २५ हजार शिक्षकांच्या

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्यातील मराठी शाळांच्या भीषण परिस्थितीवर भाष्य करणारी एक पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे.सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारने महाराष्ट्रातील पालकांचा कल इंग्रजी शाळांकडे वाढत असल्याने मराठी शाळा बंद पडत असल्याची स्थिती सभागृहात कबूल केल्याचे नमूद केले आहे. राज्यातील तब्बल २५५ शाळा मागील दोन वर्षांत बंद पडल्या आहेत. महाराष्ट्रातच मराठी भाषेच्या शाळांची ही स्थिती होणे अतिशय गंभीर आणि खेदजनक असल्याचे सुळे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.एकीकडे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला तर दुसरीकडे शिक्षणाच्या परिघातून मराठी भाषा हळूहळू दूर होतेय असे चित्र दिसते. अभिजात भाषेच्या विकासासाठी केंद्र शासनाच्या माध्यमातून मिळणारा निधी मराठी भाषेतून शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी वापरता येऊ शकतो. शासनाने याबाबत गांभीर्याने विचार करून मराठीतून शिक्षण अधिकाधिक दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण करण्यासाठी काम करावे. मराठी भाषेची पताका फडकवत ठेवण्यासाठी हे आवश्यक असल्याचे मतही सुळे यांनी आपल्या पोस्टमधून व्यक्त केले आहे.विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारने लेखी प्रश्नोत्तरात राज्यातील मराठी शाळांच्या सद्यस्थितीची माहिती दिली. सरकारकडे विचारणा करताना राज्यात कमी पटसंख्येमुळे २ हजार मराठी शाळा अडचणीत आल्या असून त्यापैकी ६२० शाळा बंद होणार असल्याने २५ हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत. कोकण विभागात ७००, विदर्भात ८०० हून अधिक, पश्चिम महाराष्ट्रात ७०० हून अधिक, मराठवाड्यात ४००, उत्तर महाराष्ट्रात ३०० हून अधिक मराठी शाळा बंद होण्याच्या स्थितीत आहेत.डिसेंबर २०२५ मध्ये ६२० मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचा परिणाम म्हणून ७० गावांमध्ये ना शाळा, ना पाटी-पेन्सिल अशी स्थिती निर्माण झाली आहे. मराठी शाळा वाचवण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिक्षक, विद्यार्थी आणि संस्थाचालकांनी लाखोंच्या संख्येने मोर्चा काढून महाराष्ट्र शासनास निवेदन सादर केले आहे.या सगळ्यावर कुठली कार्यवाही किंवा उपाययोजना करण्यात आली आहे किंवा येणार आहे? नसल्यास कारणे काय त्याची माहिती देण्याबाबतची मागणी एका निवेदनाद्वारे विधान परिषदेचे आमदार अमोल मिटकरी, सत्यजित तांबे, विक्रम काळे, शिवाजीराव गर्जे, सतीश चव्हाण, नायकवडी यांनी सरकारकडे केली होती.

-------------

### आयुर्वेद उपचारासाठी वनौषधी वनस्पतींचे

चालल्याने आयुर्वेदात महत्वाचा घटक असलेल्या कित्येक वनौषधी नष्ट होत आहेत. त्यावर उपाय म्हणून शेतकरी बांधवांनी वनौषधी लागवड करावी. यामुळे जमीनीचा पोत ही सुधारेल व शेतीतून उत्पन्नही वाढू शकेल. आपल्या भाषणातून राष्ट्रपतींनी आयुर्वेदासोबतच युनानी, होमिओपॅथी, योगा, सिध्द, नैचरोपैथी आदी उपचार पध्दतीबाबतही गौरवौद्गार काढले. या आरोग्य मेळाव्याचे मंचावर राज्यपाल आचार्य देवव्रत, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, पालकमंत्री मकरंद पाटील, कामगार मंत्री आकाश फुंडकर व अ.भा.आयुर्वेद संमेलन ट्रस्टचे अध्यक्ष वैद्य राकेश शर्मा उपस्थित होते.उद्घाटन कार्यक्रमापूर्वी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी श्री संत गजानन महाराज यांच्या मंदिरात जाऊन समाधीस्थळाचे दर्शन, पूजा व आरती केली. संस्थानच्या वतीने टाळ- मृदंगाच्या निनादात राष्ट्रपतींचे स्वागत स्वागत करण्यात आले.

------------

### अनिल अंबानींना

इमारतीवर टाच आणली आहे. सीबीआयनं एफआयआर दाखल केल्यावर ईडीनं ही कारवाई केली आहे. अनिल अंबानी यांच्या मालकीच्या कंपन्यांवर फसवणूक, लाचखोरी आणि सार्वजनिक पैशांचा दुरुपयोग केल्याचे आरोप आहेत.पीएमएलएच्या कलम १७ च्या अंतर्गत, रिलायन्स समूहाशी संबंधित ३५ पेक्षा अधिक मालमत्तांवर छापे टाकण्यात आले आहेत. या कारवाईचा आवाका बराच मोठा आहे. ५० पेक्षा अधिक कंपन्या चौकशीच्या फेऱ्यात अडकल्या आहेत. या प्रकरणी मुंबई आणि दिल्लीतील २५ पेक्षा अधिक जणांची चौकशी करण्यात आलेली आहे.२०१७ ते २०१९ या कालावधीत येस बँकेसाठी जवळपास ३००० कोटी रुपयांचं कर्ज घेण्यात आलं. ते पद्धतशीरपणे अन्यत्र वळवण्यात आलं, अशी माहिती प्राथमिक तपासातून समोर आली आहे. ही रक्कम शेल कंपन्यांच्या माध्यमातून फिरवण्यात आली, याचा शोध तपास यंत्रणा घेत आहेत.

-----------

### राज्यसभेसाठी भाजपच्या

रामदास आठवले, रावसाहेब दानवे, प्रीतम मुंडे, विजया रहाटकर, धैर्यशील पाटील आणि भागवत कराड यांच्यासह इतर नावांची चर्चा होत आहे. कोअर कमिटीच्या नावांचा प्रस्ताव दिल्लीत चर्चेला जाणार आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबिन यांची भेट घेऊन या नावांची चर्चा करतील. त्यानंतर नावांवर शिक्कामोर्तब केले जाईल. २८ फेब्रुवारीपर्यंत राज्यसभेची नावे जाहीर केली जाणार आहेत.रामदास आठवले यांची टर्म संपत आहे. त्यामुळे रामदास आठवले यांना मित्रपक्ष म्हणून भाजपच्या कोट्यातून संधी दिली जाणार असल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे प्रीतम मुंडे यांच्या जागेवर मागच्या वेळी पंकजा मुंडे या निवडणूक लढल्या होत्या. त्यामुळे प्रीतम मुंडे यांची राज्यसभेवर वर्णी लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भागवत कराड यांची देखील टर्म संपत आहे त्यामुळे त्यांना देखील पुन्हा संधी देतात का हे पाहणे महत्त्वाचे ठरते.धैर्यशील पाटील, रावसाहेब दानवे यांचा देखील लोकसभा निवडणुकीवेळी पराभव झाला होता. त्यांची नावं देखील राज्यसभेसाठी चर्चेत आहेत. १० ते १२ नावांवर भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीत चर्चा झाली. आता रवींद्र चव्हाण दिल्लीत जाऊन राष्ट्रीय अध्यक्षांची भेट घेऊन चर्चा करतील. त्यानंतर नावं फायनल केली जातील.

--------------

### राज्यसभेसाठी शरद पवार

खासदारकन्या सुप्रिया सुळे यांनी फिल्डींग लावण्यास सुरुवात केली आहे. दिल्लीत असलेल्या सुळे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याशी चर्चा करणार आहेत. राष्ट्रवादी शपचे नेते जयंत पाटील, शशिकांत शिंदे यांनी शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे भेटीसाठी वेळ मागितला आहे.दुसरीकडे काँग्रेसनं राज्यसभेच्या एकमेव जागेसाठी उद्धव ठाकरेंशी चर्चा सुरु केली आहे. राज्यसभा काँग्रेसला सोडा आणि मे महिन्यात रिक्त होत असलेली विधान परिषदेची जागा शिवसेनेला घ्या, अशी ऑफर काँग्रेसकडून ठाकरेंना देण्यात आली आहे. मे महिन्यात ठाकरेंची विधान परिषदेची टर्म संपणार आहे. २०१९ मध्ये ठाकरे मुख्यमंत्री झाले. त्यामुळे ते परिषदेच्या माध्यमातून आमदार झाले आणि संसदीय राजकारणात आले. आता ते पुन्हा एकदा परिषदेवर जाणार की अन्य कोणाला संधी देणार याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे. शरद पवार यांचे सर्वपक्षीय संबंध पाहता, त्यांची ज्येष्ठता पाहता, राज्यसभेची रिंगणात खुद्द पवार उतरणार असतील, तर ही निवडणूक बिनविरोध होऊ शकेल. किंबहुना निवडणूक बिनविरोध होत असल्याची खात्री पटल्यावरच शरद पवार अर्ज दाखल करतील. शरद पवार दोनवेळा राज्यसभेवर गेले आहेत. दोन्ही वेळा निवडणूक बिनविरोध झालेली आहे. शरद पवार यांची संसदीय कारकीर्द ५९ वर्षांची आहे. या कालावधीत ते एकही निवडणूक हरलेले नाहीत.शरद पवार राज्यसभा निवडणुकीच्या रिंगणात नसतील, तर निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता धूसर होते. काँग्रेस किंवा ठाकरेसेनेचा उमेदवार असेल तर महायुती सातवा उमेदवार देऊन मोठा गेम करु शकते.२०२२ मध्ये देवेंद्र फडणवीस विरोधी पक्षनेते होते. त्यावेळी मविआतील अंतर्गत मतभेदांचा फायदा घेत त्यांनी राज्यसभा, विधान परिषदेच्या निवडणुकांमध्ये भाजपचे अतिरिक्त उमेदवार निवडून आणले. त्यावेळी मविआची मतं फुटली. क्रॉस व्होटिंग झालं. दुसऱ्या पसंतीच्या मतांच्या जोरावर फडणवीसांनी नियोजन केलं.

--------------

### दादांची बारामती सुनेत्राताईंच्या

काँग्रेसचे उमेदवार असतील, असा निर्णय पक्षाकडून घेण्यात आल्याची माहिती देखील मिळाली आहे आहे. सोमवारी २३ फेब्रुवारी रोजी रात्री मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसच्या झालेल्या पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत हा निर्णय झाल्याची माहिती मिळाली आहे. सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत पार्थ पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला आहे. प्रफुल पटेल यांच्या मुंबईतील निवासस्थानी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह कोअर कमिटीचे सदस्य उपस्थित होते. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील पहिल्या महिला उपमुख्यमंत्री झाल्या आहेत. तसेच सध्या सुरु असलेल्या राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन हे सुनेत्रा पवार यांच्यासाठी पहिलं अधिवेशन आहे. दादाच्या निधनानंतर रिक्त जागी पोटनिवडणूक होत असल्याने माविआने देखील पक्षीय पातळीवर बैठक लावली असल्याचे समजते शशिकांत शिंदे यांनी तसे संकेत दिले .

-------------

### मराठवाड्यात ५ लाख ३९

महिला तर ६५ वर्षे व त्यापुढील ज्येष्ठ महिलांची संख्या २ लाख ३ हजार ३८७ एवढी आहे. सर्वेक्षणानंतर विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी तसेच नागरी बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक आयोजित केली. या बैठकीत एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबवायच्या उपाययोजना तसेच कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस 'साऊ एकल महिला समिती'चे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी उपस्थित होते. तसेच विभागीय महिला व बाल विकास उपायुक्त, अपर आयुक्त (महसूल) आणि अपर आयुक्त (विकास) यांचीही उपस्थिती होती. बैठकीत एकल महिलांना आवश्यक असलेली कागदपत्रे जसे आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र, आयुष्यमान कार्ड तसेच इतर शासकीय सेवा ग्रामपंचायत स्तरावर तातडीने उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. या महिलांच्या मुला-मुलींसाठी असलेल्या बालसंगोपन योजनेत पात्र विद्यार्थ्यांचा समावेश करण्यासाठी शिक्षण विभागामार्फत शाळांच्या मुख्याध्यापकांकडून अर्ज भरून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. रोजगारक्षम महिलांना महिला बचत गटांमध्ये समाविष्ट करणे, प्रत्येक तालुक्यात उद्योजकतेला प्रोत्साहन देणाऱ्या कार्यशाळा आयोजित करणे अशा उपक्रमांचाही प्रारंभी निर्णय घेण्यात आला आहे. विभागातील सर्व जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या जिल्ह्यांमध्ये एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी नाविन्यपूर्ण उपाययोजनांवर स्वतंत्र बैठका आयोजित कराव्यात, असे निर्देशही विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी दिले.

-----------------

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१५८४ दिनांक-२२/१२/२०२५

अर्जदार श्रीमान/श्रीमती भाऊसाहेब अंकुश पवार रा.पिंपरखेड खु. ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | शिव भाऊसाहेब पवार | मुलगा | ०१/०५/२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-२२/१२ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१५२९ दिनांक-२२/१२/२०२५

अर्जदार श्रीमान/श्रीमती श्रीमंत दगडू जाधव रा.वाघलखेडा ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या आई च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | सुंदरबाई दगडू जाधव | आई | ०८/०९/२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-११/१२ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. २६ फेब्रुवारी २०२६


## थोडक्यात



### डॉ.विलास काळे यांच्या बँकिंग ॲण्ड इन्शुरन्स पुस्तकाचे प्रकाशन

माजलगाव । प्रतिनिधी

सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्रा.डॉ.विलास काळे लिखित बँकिंग अँड इन्शुरन्स या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ.जी.के. सानप यांच्या हस्ते संपन्न झाले.

प्रा.डॉ.विलास काळे यांचे बँकिंग अँड इन्शुरन्स हे पुस्तक नवीन शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आले असून यामध्ये बँकिंग क्षेत्रातील मूलभूत संकल्पना सोप्या व सुलभ पद्धतीने मांडण्यात आल्या आहेत. तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातील वाणिज्य विषयातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी सदरील पुस्तक उपयुक्त ठरणार आहे.विषयाची आवड असलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरणार आहे. प्रकाशन सोहळ्या प्रसंगी प्राचार्य डॉ.जी.के. सानप,प्रभारी प्राचार्य डॉ.एन.के. मुळे,उपप्राचार्य डॉ. एम.ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रा. पवनकुमार शिंदे, उपप्राचार्य प्रा. प्रकाश गवते,डॉ. सचिन रुद्रवार,डॉ नितीन ढवळे, प्रबंधक डॉ.प्रशांत चव्हाण तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

### महाराणी ताराबाई वडवणी शाळेचे एनएमएमएस परीक्षेत ३८ विद्यार्थी उत्तीर्ण

वडवणी । प्रतिनिधी

इयत्ता आठवीतील राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील (एनएमएमएस) विद्यार्थ्यांसाठी २८ डिसेंबर २०२५ रोजी घेतलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच अधिकृत संकेतस्थळावर दि.२४ फेब्रुवारी २०२६ मंगळवारी रोजी जाहीर करण्यात आला यामध्ये महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी येथील शाळेचा चि.साई ज्योतिराम टिपरे याने या परीक्षेत १५७ विक्रमी गुण घेऊन वडवणी तालुक्यात प्रथम येत नवा रेकॉर्ड निर्माण केला आहे या शाळेचे तब्बल ३८ विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.



या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शोभा के.आंधळे / डोईफोडे यांनी एनएमएमएस परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांनासाठी एक्स्ट्रा तासिकेचे शाळेत नियोजन केले होते विभाग प्रमुख चव्हाण सर,श्री.विष्णू मंत्रे सर तसेच विषय शिक्षक यांच्या सहकार्यामुळे तब्बल ३८ विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. या यशाबद्दल शाळेचे संस्थापक माजी आमदार केशवराव आंधळे,शालेय समिती अध्यक्ष संजय आंधळे,संस्थेचे अध्यक्ष अनिलदादा चोले,मार्केट कमिटी संचालक रणजीत धस, संस्थेचे संचालक इंजि.अशोक आंधळे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका शोभा के.आंधळे,उपमुख्याध्यापक मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर,श्री कुलकर्णी सर यांनी मार्गदर्शक शिक्षक व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे तसेच शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# एसटीतील करोडो रुपयांचा भ्रष्टाचार थांबवा

## महिला व ज्येष्ठांच्या सवलतींना हात लावू नका नितीन जायभाये यांचा इशारा

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राची व ग्रामिण व्यवस्थेची जीवनवाहिनी असलेल्या राज्य परिवहन महामंडळाबाबत (एसटी) सुरू असलेल्या निर्णय प्रक्रियेवर तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. महिलांचे अर्धे तिकीट आणि ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना दिली जाणारी मोफत प्रवास सुविधा बंद करण्याचा विचार सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते नितीन जायभाये यांनी आक्रमक भूमिका घेत सरकारला थेट इशारा दिला आहे.

''एसटी तोट्यात असेल, तर त्याला सामान्य जनता जबाबदार नाही. चुकीची आर्थिक धोरणे, व्यवस्थापनातील त्रुटी आणि मेंटेनन्समधील करोडो-अरबोंचा भ्रष्टाचार हेच खरे कारण आहे. सवलती बंद करून सरकार स्वतःच्या अपयशावर पांघरूण घालत आहे,'' असा घणाघाती आरोप त्यांनी केला.



एसटी ही केवळ वाहतूक सेवा नसून ग्रामीण महाराष्ट्राचा श्वास असल्याचे सांगत नितीन जायभाये म्हणाले, ''शेतकरी, कामगार, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक आणि विशेषतः माता-भगिनींचा आधार म्हणजे एसटी. महिलांचे अर्धे तिकीट हे दान नसून त्यांचा हक्क आहे. ते बंद करणे म्हणजे त्यांच्या स्वावलंबनावर घाला घालणे होय. तसेच ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास हा त्यांचा सन्मान आहे. हा सन्मान हिरावून घेणे म्हणजे त्यांच्या आयुष्यभराच्या कष्टांचा अपमान आहे.''

'सवलती बंद नकोत, भ्रष्टाचार बंद करा!'

जायभाये यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, एसटी तोटच्यात असेल तर: मेंटेनन्समधील भ्रष्टाचारावर लगाम लावा, रिक्त पदे तात्काळ भरा, मार्ग नियोजन सुधारून तोट्याच्या फेऱ्या कमी करा, इंधन खरेदी व वापर धोरण पारदर्शक करा, ''पण गरीब, महिला आणि ज्येष्ठांवर गदा आणू नका. सामाजिक न्यायावर कुठलाही आघात आम्ही सहन करणार नाही. गरज पडल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल,'' असा इशाराही त्यांनी दिला.

लालपरीसाठी तीन ठोस मागण्या

एसटीला ''अधिक चांगले दिवस'' आणायचे असतील तर तातडीने खालील निर्णय घ्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली

१) पारंपारिक लालपरीला प्राधान्य द्या

नवीन हिरव्या रंगाच्या शिवाई चार्जिंग गाड्या भाडेतत्त्वावर घेण्याचे धोरण थांबवावे. पारंपारिक लालपरी बस खरेदी करून सेवा टिकवावी, जेणेकरून सवलती आणि सुविधा कायम राहतील. २) स्मार्ट कार्ड सर्वांसाठी परवडणारे करा : सध्याची स्मार्ट कार्ड योजना सर्वसामान्य प्रवाशांना परवडणारी नाही. रोज किंवा आठवड्यातून एकदा प्रवास करणाऱ्यांसाठी कमी किमतीत उपलब्ध करून द्यावी.

३) खाजगी बसेसचा वापर त्वरित थांबवा :

विशिष्ट कंपन्यांना फायदा होईल अशा खाजगी तत्त्वावरील बसेसचा वापर बंद करावा. या धोरणामुळे एसटी आर्थिक अडचणीत सापडली असल्याचा आरोप त्यांनी केला.

''एसटी वाचवा, महिला सन्मान वाचवा, ज्येष्ठांचा अधिकार वाचवा'' हे आमचे धोरण आहे. सवलती बंद करण्याचा कोणताही प्रयत्न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा ठाम इशारा नितीन जायभाये यांनी दिला आहे. ग्रामीण महाराष्ट्राच्या जीवनवाहिनीवर घाला घालणारे निर्णय सरकारने त्वरित मागे घ्यावेत, अशी जोरदार मागणी आता सर्व स्तरांतून पुढे येत आहे.

## गेवराई शहरामधील विना परवाना अन् अधिकृत बांधकामे रोखा-क्रांति युवा सेना

**गेवराई । प्रतिनिधी**

दि.२४/०२/२०२६ रोजी गेवराई नगरपरिषद कार्यालय मध्ये जावून मुख्य अधीकारी यांना लोक क्रांती सेनाच्या वतीने निवेदन देण्यात आले. या वेळी निवेदनाद्वारे कळवण्यात आले आहे की, गेवराई शहरामधील बिना परवाने बांधकाम मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहेत. या बिना परवाने बांधकाम धारकावर कठोर कारवाई केली जावीत. व अवैधरित्या हे बांधकामे शासन नियमाप्रमाणे पाडण्यात यावेत.

व अशा अवैधरित्या बांधकाम करणार्या लोकांनवर कठोर दंडात्मक कार्यवाई करण्यांत यावी. अशा शासनाला फसवनार्या लोकांना कुठलीही सुट देऊ नये. अन्यथा



''लोक क्रांती सेना'' रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. या संदर्भात वरिष्ट स्तरावरून देखील कार्यवाहीची माघणी केली गेली आहे. या निवेदनाद्वारे मुख्य अधीकारी साहेब यांनी सांगितले की, येणाऱ्या मार्च महीन्याच्या आत सर्व गेवराई शहरामधील बिना परवाने बांधकाम धारकावर कठोर कार्यवाई केली जाईल. असे अश्वासन दिले आहे. आपण जे घंटानाद अंदोलन करणार अहात ते काही दिवस माघे घ्यावे. असे गेवराई नगरपरिषद चे मुख्य अधीकारी साहेब यांनी विनंती केली. यावर कार्यवाही जर झाली नाही तर मात्र आपण पुढे हे अंदोलन करा असे सांगितले आहे.

मुख्य अधीकारी साहेबाच्या विनंतीला मान देवुन ही लढाई काही वेळे पुर्ती थांबविली जाईल.समाजाच्या विविध कारणाठी लोक क्रांती सेना लढल्या शिवाय राहणार नाही. जय क्रांती. या वेळी निवेदन देताना '' लोक क्रांती सेना '' चे बीड जिल्हा अध्यक्ष प्रा. राहुल बांगर

गेवराई तालुका अध्यक्ष सुनिल मिसाळ गेवराई उपतालुका अध्यक्ष गोकुळ पवार गेवराई शहर प्रमुख राम रोकडे उपस्थिति होते.

## पान ६ वरून...

### आ.संदिप क्षीरसागरांनी घेतली

महामार्ग क्र.३६१ चे विस्तारीकरण, मजबुतीकरण तसेच आवश्यक त्या ठिकाणी भुसंपादन करण्याचे काम सन २०१८ मध्ये मंजुर झालेले आहे. परंतु संबंधित कंत्राटदाराने सदरील काम अंदाजपत्रकानुसार न करता अत्यंत निकृष्ठ दर्जाचे करून अर्धवट सोडले आहे. त्यामुळे या रस्त्यावर अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. पादचायांना, ग्रामस्थांना तसेच प्रवाशांना दैनंदिन प्रवासात प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, रस्त्यालगत राहणाया नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. यासोबतच या रस्त्यासाठी ज्यांनी स्वत:च्या जमिनी दिल्या आहेत त्या शेतकयांना आजपर्यंत योग्य मोबदला (मावेजा) मिळालेला नाही. अनेकवेळा संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून ही न्याय मिळत नसल्याने शेतकयांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यामुळे आ.संदिप क्षीरसागर यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.शिवेंद्रसिंह राजे भोसले यांची भेट घेऊन हा महत्वाचा प्रश्न मांडला आहे.

### जीएसटी अधिकारी सचिन

या ठिकाणी सचिन जाधवर यांचे कुटुंबीय, महिला, मुले आणि नातेवाईक उपोषणाला बसलेले होते. ऊन खूप असल्याने या ठिकाणी सावली व्हावी म्हणून मंडप टाकण्याचे काम सुरू होते. मात्र पोलीस अधिकाऱ्यांनी याला मज्जाव केला.या ठिकाणी मंडप टाकू दिला नाही. या पोलिसांना महिना झाला तरी आरोपी सापडत नाही मात्र फिर्यादीवर दबाव आणून त्यांना लोकशाही मार्गाने उपोषण करण्यासही मज्जाव केल्याने यासंदर्भात नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी सचिन जाधवर यांच्या पत्नी मयुरी जाधवर, नारायण जाधवर ,शामल जाधवर या सर्वांसह त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपोषणाला बसले होते. यावेळी पोलीस अधीक्षक श्रीमती पवार यांनी सोमवार पर्यंत आरोपीला अटक करू असे आश्वासन दिल्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले.

### श्रीक्षेत्र बप्पाजी बाबा संस्थान

श्रीक्षेत्र बप्पाजी बाबा संस्थान हे वाचासिद्धि श्रीसंत बप्पाजी बाबा यांचं समाधी स्थळ आहे. अतिशय पवित्र ठिकाण असलेले हे संस्थान या वर्षी मूर्ती प्राणप्रतिष्ठा असल्याने सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन श्री. ह.भ.प .जनार्दन महाराज बांगर (श्रीक्षेत्र बप्पाजी बाबा संस्थान)यांनी केले आहे.

### शहरातील लाईट सुरळीत ठेवा

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार गटाचे गटनेते खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने म.वि.वि.कं. चे मुख्य अभियंता साहेब यांची भेट घेतली, म.वि.वि.चे मुख्य अभियंता साहेब यांनी वरील समस्या संदर्भात विशेष लक्ष देऊन कामे मार्गी लागेल असे आश्वासन दिले आहे, यावेळी गटनेते नगरसेवक खुर्शीद आलम, नगरसेवक भारत कांबळे, नगरसेवक अथहर भाई, नगरसेवक जाधव साहेब, नगरसेवक अय्युब खान, नगरसेवक शेख अफसर, नगरसेवक मसुद खान, नगरसेवक रईस भाई, नगरसेवक मसी मोमीन, नगरसेवक उल्हास ग्राम, नगरसेवक पिंगळे साहेब, नगरसेवक काळे साहेब आ.संदिप भैय्या क्षीरसागर यांचे पी.ए. चौरे साहेब उपस्थित होते.

### माजलगावतेलगाव बस

करण्यात आली.महिलांसाठीचे स्वच्छतागृह बसथांब्यापासून दूर असून त्याची स्वच्छता समाधानकारक नसल्यामुळे महिला प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. तसेच बस स्थानक परिसरात खाजगी वाहनांचे मुक्त पार्किंग होत असल्यामुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत असल्याचेही पाहणीत स्पष्ट झाले. या सर्व बाबींचे जीपीएस फोटो पुराव्यासह प्रशासनाला सादर करण्यात आले असून, नवीन बस स्थानकाचे बांधकाम सुरू असले तरी तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात आवश्यक सुविधा व सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनाच्या प्रती माननीय आमदार तसेच शहर पोलीस स्टेशन, माजलगाव यांनाही देण्यात आल्या असून प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. यावेळी माजलगाव विकास प्रतिष्ठान च्या सचिव नीला देशमुख, डॉ. वरुणराज तौर, अर्चना जाधव, ललिता सोळंके, मीना कदम, सखाराम जोशी, संतोष पालकर उपस्थित होते.

### धार्मिक स्थळाकडे जाणाऱ्या

गंभीर प्रशासकीय बेजबाबदारी असल्याचा आरोप होत आहे. तातडीने कचरा टाकणे थांबवावे, साचलेला कचरा हटवून आग पूर्णतः नियंत्रणात आणावी, तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया दिली.

''अनेक दिवसांपासून आम्ही ही बाब नगरपालिकेच्या तसेच जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत आहोत. मात्र, त्यांना काहीही जाग येत नाही. यावरून स्पष्ट होत आहे की, या प्रकाराला संबंधित यंत्रणांचीच फूस आहे.''- रामनाथ खोड



## एनएमएमएस परीक्षेत खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचे यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**एनएमएमएस परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत खोलेश्वर मा. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असून परीक्षेसाठी १४३ विद्यार्थी प्रविष्ट होते.**


त्यापैकी ५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यात १०० च्या पेक्षा अधिक गुण ०९ विद्यार्थ्यांनी संपादन केले आहे.

या विद्यार्थ्यांना मेघा कुलकर्णी,लक्ष्मण काटे,अमरजा कुलकर्णी, अक्रुर यादव यांचे मार्गदर्शन लाभले.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र अलुरकर, उपाध्यक्ष ज्योती ठाकुर,कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य,मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा.चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य,स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे,कार्यवाह किरण कोदरकर, शालेय समितीचे अध्यक्ष अविनाश मुडेगांवकर,शालेय समिती सदस्य,मुख्याध्यापक अनंतराम कोपले,इतर शालेय पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## श्री सिद्धेश्वर संकुलात परमपूज्य गोळवलकर गुरुजी त्रिदिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुल माजलगाव येथे दिनांक २७ फेब्रुवारी, २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ या कालावधीत प्रति वर्षीप्रमाणे याही वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक परमपूज्य गोळवलकर गुरुजी यांच्या स्मृति प्रित्यर्थ व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे हे २१ वे वर्षे आहे. यानिमित्त दिनांक २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६:०० वाजता श्री. योगेश सोमन (प्रसिद्ध सिने अभिनेते तथा राष्ट्रीय विचारवंत, मुंबई) यांचे भारतीय संस्कृतीवरील आघात या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. तसेच दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक २८ फेब्रुवारी शनिवार रोजी श्री.भरत अमदापुरे (प्रसिद्ध लेखक, सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रीय विचारवंत पुणे) यांचे वाटचाल विकसित भारताची या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे तर तिसऱ्या दिवशी म्हणजेच दिनांक १ मार्च रविवार रोजी श्री. ब्रिगेडियर हेमंत महाजन (निवृत्त भारतीय सेना अधिकारी,पुणे) यांचे ऑपरेशन सिंदूर : सामर्थ्य भारताचे या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे.ही व्याख्यानमाला श्री सिध्देश्वर महाविद्यालयाच्या परिसरामध्ये दररोज सायंकाळी ६ :०० वाजता संपन्न होणार आहे.



तरी या तीन दिवशीय व्याख्यानमालेस माजलगाव व माजलगाव परिसरातील डॉक्टर, वकिल, पत्रकार, प्रतिष्ठित नागरिक, पालक तसेच शैक्षणिक संकुलाचे माजी विद्यार्थी , श्रोत्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन व्याख्यानमालेचे अध्यक्ष अभय कोकड, व्याख्यानमालेचे कार्यवाह प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे, श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अँड. विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष पवन मानधने, शिशुविहार विभागाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत जोशी, सी.बी.एस.सी. विभागाचे अध्यक्ष तेजस महाजन, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुमती भारती,शिशुविहार विभागच्या प्रमुख वर्षा कुलकर्णी, सी.बी.एस.सी. प्राचार्य वंदना मिटकरी तसेच स्थानिक पदाधिकारी यांनी केले आहे.

## अ भा म पत्रकार परिषद अंतर्गत वैद्यकीय कक्षाच्या महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्षपदी डॉ. राजेश इंगोले यांची नियुक्ती, सर्वत्र अभिनंदन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद अंतर्गत कार्यरत वैद्यकीय कक्षाच्या महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्षपदी अंबाजोगाई येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉक्टर राजेश इंगोले यांची नियुक्ती करण्यात आल्याने डॉक्टर इंगोले यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने राज्यातील आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण सोहळा रायगड जिल्ह्यातील कर्जत या ठिकाणी नुकताच संपन्न झाला. मराठी पत्रकार परिषदेच्या अंबाजोगाई शाखेनेही मागील तीन-चार वर्षात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल आदर्श पत्रकार संघ म्हणून अंबाजोगाईची निवड केल्यामुळे या पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित राहण्या साठी परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी अंबाजोगाई येथील वैद्यकीय कक्ष प्रमुख व सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉक्टर राजेश इंगोले यांना विशेष निमंत्रित केले होते. यावेळी त्यांच्या समवेत मराठी पत्रकार परिषदेचे हल्ला विरोधी कृती समितीचे बीड जिल्हा निमंत्रक दत्तात्रय आंबेकर, प्रशांतजी लाटकर, पुनमचंद परदेशी, प्रशांत मस्के यांची उपस्थिती होती.



यावेळी डॉक्टर राजेश इंगोले यांनी मागील तीन वर्षात अंबाजोगाई शहरातील पत्रकार बांधवांच्या आरोग्यासाठी विविध प्रकारच्या शिबिराचे आयोजन करून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल माननीय एस एम देशमुख यांनी अंबाजोगाई चा हा पॅटर्न संपूर्ण राज्यभरात राबवण्याच्या उद्देशाने डॉक्टर राजेश इंगोले यांची वैद्यकीय कक्षाच्या महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्षपदी निवड जाहीर केली असून या निवडीचे पत्र लवकरच त्यांच्या कडे सुपूर्त केले जाईल असे एस एम देशमुख यांनी सांगितले.

डॉ राजेश इंगोले हे इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समितीचे राज्याध्यक्षही व केंद्रीय मध्यवर्ती कार्यकारणी सदस्यही आहेत आहेत. तसेच त्यांनी विविध शासकीय समित्यावर काम केले आहेव अंबाजोगाई नगर परिषदेत शिक्षण सभापती म्हणून कार्य केले आहे.

राज्यातील पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी डॉक्टर राजेश इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच सर्व शाखा स्तरावर वैद्यकीय कक्ष प्रमुखाची नियुक्ती करण्यात येणार असून महाराष्ट्र राज्याच्या वैद्यकीय कक्षाच्या कार्याध्यक्षपदी डॉक्टर राजेश इंगोले यांची नियुक्ती करण्याचे घोषित केल्यानंतर डॉक्टर इंगोले यांचे मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, किरणजी नाईक, शरद पाबळे, परिषदेचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत अष्टीवकर, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिलजी वाघमारे, प्रदेश सदस्य सुभाषची चौरे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंखे, रवी उबाळे, विलास डोळसे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक दत्तात्रय आंबेकर, निमंत्रक अभिमन्यू घरत, ज्येष्ठ पत्रकार मित्र अनिलजी महाजन, अविनाश मुडेगावकर, प्रशांत बर्दापूरकर, रवी मठपती रमाकांत पाटील, रमाकांत उडानशिव, प्रकाश लखेरा, अभिजीत गाठाळ, अभिजीत गुप्ता, परमेश्वरजी गीते, दिलीप अडसूळ, अतुल जाधव, रणजित डांगे, रवी मठपती, शिवकुमार निर्मळे, प्रदीप तरकसे, रोहिदास हातागळे, महादेव गोरे, दादासाहेब कसबे यांच्यासह मराठी पत्रकार परिषदेचे एम एम कुलकर्णी, प्रशांतजी लाटकर, वीरेंद्र गुप्ता, गोविंद खरटमोल, राहुल देशपांडे, अशोक दळवे, सलीम गवळी, व्यंकटेश जोशी, ज्ञानेश मातेकर, संजय रानभरे, गोविंद जाधव, गणेश चांगिरे, परमेश्वर वैद्य, पुनमचंद परदेशी, प्रशांत मस्के, मोहम्मद फैजान, शेख मुशीर बाबा, श्रीकांत कदम, उत्तरेश्वर शिंदे यांनी अभिनंदन केले असून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# चाऱ्यासाठी अनुदान देण्याबाबत निर्णय घेऊ

## दुग्धविकासमंत्री अतुल सावे यांची विधानसभेत माहिती

मुंबई : पशूखाद्याचे दर वाढलेले नाहीत. ते स्थिर आहेत. पण चाऱ्यासाठी अनुदान देण्याबाबत पशूसंवर्धन विभागाशी चर्चा करुन निर्णय घेऊ, अशी ग्वाही दुग्धविकासमंत्री अतुल सावे यांनी मंगळवारी (दि.२४) विधानसभेत दिली. चारा, ढेप महागली असून दूध व्यवसाय आता परवडत नाही. दुधावर अनुदान मिळते, त्याप्रमाणे चाऱ्यावर, ढेपवर अनुदान देता येईल का?, यावर सरकारने विचार करावा. छोट्या दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी कोणती योजना आणणार आहात का?, असा प्रश्न भाजपचे मूर्तिजापूरचे आमदार हरीष पिंपळे यांनी उपस्थित केला होता. त्यावर मंत्री सावे यांनी, कुठल्याही प्रकारच्या चाऱ्याचा भाव वाढलेला नसल्याची माहिती सभागृहात दिली.

म्हशीला ढेप लागते. नोव्हेंबरमध्ये ढेपचा भाव ३० रुपये होता, तो आता ४१ रुपये आहे. ढेप, चाऱ्याचे भाव दर महिन्याला बदलत आहेत. वैरण विकासासाठी जे बियाणे दिले जाते; त्यातून काही निघत नाही. मी स्वतः दूध उत्पादक शेतकरी आहे. सध्या दूध उत्पादक शेतकऱ्याला तोटा सहन करावा लागत आहे. तसेच महाराष्ट्रात सर्व जनावरे हरियाणा, गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशातून आणली जातात. चांगल्या प्रतीची जनावरे




आणली तरी ती केवळ सहा महिनेच दूध देतात. त्यानंतर त्यांचे दूध कमी झाले की ती परवडत नाहीत. ती कसायाकडे जातात. यामुळे चांगली दूध देणारी जनावरे तयार होत नाहीत, अशी दूध उत्पादकांची समस्या पिंपळे यांनी मांडली. त्यावर उत्तर देताना मंत्री सावे यांनी सांगितले की, सोनाई, हिरा, सुग्रास, इंद्रनील या ब्रँडेड पशूखाद्याचे दर वाढलेले नाहीत. हिरवा चारा, सुका कडबा, मुरघास याचे दर खूप काही वाढ झालेली नाही. चाऱ्याला अनुदान देण्याबाबत पशूसंवर्धन विभागाशी चर्चा करुन निर्णय घेऊ आणि त्यावर मार्ग काढू. ढेप दराबाबतही कृषी विभागाशी चर्चा करु. दोन्ही विभागाशी संयुक्त बैठक घेऊन निर्णय घेऊ. २०२४-२५ मध्ये सरकारने अनुदान दिले होते. ५ रुपये आणि ७ रुपये अशा दोन्ही अनुदानाचे मिळून १,५८२ कोटी रुपये दिले होते. त्याकाळापुरतेच हे अनुदान दिले होते. तो काळ संपलेला आहे. आता याबाबत मंत्रिमंडळावर चर्चा करुन निर्णय घेऊ. राष्ट्रवादीच्या आमदार सुलभा खोडके यांनी, दूध दराचा प्रश्न उपस्थित केला. प्रत्येक जिल्ह्यात दूध संघाचे दर वेगवेगळे आहेत. कोल्हापूर, अहिल्यानगर, नागपूरमधील दूध खरेदीचे दर वेगवेगळे आहेत. संपूर्ण राज्यात एकच भाव मिळाला तर शेतकऱ्यांना न्याय मिळेल, याबाबत धोरण आखणार का? असा प्रश्न केला. त्यावर सावे यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली. वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये वेगवेगळे दूध संघ आहेत. गोकुळ, वारणा अशा त्या त्या जिल्ह्यातील दूध संघांना दुधाचा दर ठरवण्याचा अधिकार आहे. पूर्वी शासन दूध दर ठरवत होते. आता दूध संघांना खरेदीचा दर ठरवण्याची मूभा दिलेली आहे. शासन भाव ठरवू शकत नाही, असे सावे यांनी स्पष्ट केले.

# पपईचा आकार बिघडण्याची कारणे



शेतकरी बांधव फळे व भाजीपाला लागवडीतून अधिक नफा कमावतात, मात्र कधी तापमानात घट झाल्यामुळे तर कधी खताच्या कमतरतेमुळे पिकाची नासाडी होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यांना त्यांच्या पिकांचे चांगले उत्पादन मिळत नाही. रात्रीचे तापमान कमी झाल्यावर, जास्त आर्द्रता आणि नायट्रोजनची पातळी वाढली की त्याचा पपई पिकावर परिणाम होत असल्याचे अनेकदा दिसून येते. त्यामुळे फळांचा आकार बदलून फळांचे भाव खाली येतात व शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नाही.

पपई फळातील रोगाची कारणे :जेव्हा जमिनीत बोरॉनची कमतरता असते, तेव्हा पपई पिकावर रोग उद्भवतात. याशिवाय जेव्हा हवामान कोरडे होते, तेव्हा पपई पिकावर हा प्रकार अधिक दिसून येतो. शास्त्रज्ञ म्हणतात की जेव्हा जमिनीत बोरॉनची कमतरता असते तेव्हा झाडाची वाढ थांबते. उलटपक्षी, जवळच्या ऊतींमध्ये वाढ होते. त्यामुळे फळे येतात आणि खराब होतात.

पपईच्या फळांचा आकार बिघडण्याची कारणे :बोरॉनच्या कमतरतेमुळे, प्रभावित फळामध्ये बियाणे तयार होत नाही किंवा कमी विकसित होते. झाडांच्या वाढीवर परिणाम होऊन झाडांची उंची लहान होते. अपरिपक्व फळाच्या पृष्ठभागावर दूध दिसून येते. फळ कडक होते, अशी फळे लवकर पिकत नाहीत आणि चवहीन असतात फळाचा आकार खराब होतो. झाडांवरून फुले पडू लागतात.काय कराल उपाय ? : अशा स्थितीत पपई लागवडीत सेंद्रिय खतांचा मुबलक वापर करावा. माती परीक्षण करून घ्या. बोरॉनचे प्रमाण जमिनीत तपासा.

# कमळ शेती शेतकऱ्यांसाठी अधिक फायद्याची

भारताचे राष्ट्रीय फूल कमळ हे सर्वांना माहीत आहे. पण तुम्हाला माहिती आहे का की पाण्यात उगवणारे कमळाचे फूल आता शेतातही वाढू शकते. होय! ही वेगळी बाब आहे की त्याची लागवड बहुतेक पाण्याच्या बागांमध्ये केली जाते, परंतु ही गोष्ट जुनी झाली आहे, कारण आता तलाव आणि डबके यांच्या व्यतिरिक्त शेतात कमळाची लागवड केली जात आहे. कमळाचे पीक अवघ्या ३ ते ४ महिन्यांत तयार होते. त्याची लागवड करण्यासाठी लागणारा खर्चही खूप कमी आहे. सरकारही आता शेतकऱ्यांना कमळाचे सह-पीक करण्यासाठी करून मदत करत आहे. अशा परिस्थितीत शेतकरी बांधव त्यांच्या शेतात कमळाची लागवड कशी करू शकतात हे जाणून घेऊया. शेतात कमळाची फुले लावण्यासाठी २५ ते ३० हजार रुपये खर्च येतो. जमीन : हे पीक ओलसर जमिनीत घेतले जाते. याशिवाय हलकी काळी मातीही यासाठी योग्य मानली जाते. हवामान : कमळाच्या वाढीसाठी योग्य प्रकाश द्यायला हवा. यासाठी दिवसातून किमान सहा तास सूर्यप्रकाश आवश्यक असतो. कमळाचे थंडीपासून संरक्षण करणे आवश्यक आहे.

शेतीसाठी योग्य वेळ : जुलै महिन्यात कमळाची शेती केली जाते, कारण या महिन्यात पावसाळ्यामुळे शेतात पुरेसे पाणी असते.

बियाणे पेरणे : त्यासाठी शेतकरी प्रथम शेत नांगरतात, त्यात कमळाची मुळे लावतात, त्यानंतर त्याच्या बिया पेरण्याचे काम केले जाते. बिया पेरल्यानंतर, शेतात सुमारे दोन महिने पाण्याने भरलेले ठेवले जाते, कारण आपल्याला माहित आहे की कमळ फक्त पाण्यातच उगवले जाते. अशा स्थितीत त्याच्या पिकासाठी पाणी आणि गाळ या दोन्ही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात. हेच कारण आहे की रोप लावल्यानंतर शेतात पाणी आणि चिखल दोन्ही भरतात, त्यामुळे कमळाची झाडे झपाट्याने वाढतात. कापणीचा कालावधी : पीक ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये काढणीसाठी तयार होते. त्याच्या मुळांमध्ये जितके जास्त गाठी असतील तितकी जास्त झाडे बाहेर येतात. त्याच्या बियांचा घडही झाडांवरच तयार होतो.

कमळाच्या बिया येथे मिळतात : तुम्ही कमळाच्या बिया ऑनलाइन किंवा तुमच्या जवळच्या रोपवाटिका किंवा कोणत्याही उद्यान केंद्रातून खरेदी करू शकता. अनेक सरकारी रोपवाटिकांमध्ये त्याच्या बिया आणि रोपेही मोफत दिली जातात.एवढा मिळतो नफा : कमळाच्या लागवडीमुळे कमी वेळेत जास्त उत्पन्न मिळते. एका अंदाजानुसार यामध्ये एक एकरात सुमारे सहा हजार झाडे लावता येतील. त्याच वेळी, त्याची फुले सुमारे १२ हजार रुपयांना मोठ्या प्रमाणात विकली जातात. त्याच्या बिया, बियांची पाने, कमळाचे गुट्टे आणि कमळाचे फूल स्वतंत्रपणे विकले जाते. अशा परिस्थितीत लागवडीनंतर केवळ ३ महिन्यांनी ५५ हजार रुपयांहून अधिक नफा मिळू शकतो. दुप्पट नफा कसा कमवायचा? : शेतकरी कमळाचे पीक वॉटर चेस्टनट आणि माखना या पिकांसह घेऊ शकतात. यासोबतच शेतकऱ्याची इच्छा असल्यास कमळाच्या लागवडीबरोबरच मत्स्यपालनाचे कामही करता येईल. त्यामुळे शेतकऱ्यांना कमळ पिकांबरोबरच इतर पिकांमधूनही उत्पन्न मिळणार आहे.



# कोंबड्यांमधील उष्माघात : लक्षणे आणि उपाय!

आता उन्हाळ्याला सुरूवात झाली आहे. माणसांप्रमाणे जनावरांना सुद्धा या उष्णतेचा फटका बसत असतो. विशेषतः कोंबड्यांमध्ये उष्माघाताची लक्षणे आढळतात. पुढील काही महिने कोंबडी पालन व्यवस्थापनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. उन्हाळ्यात मांसल कोंबड्यांची चढ्या दराने विक्री होते. परंतु उन्हाचा ताण सहन न करू शकल्याने अंडी, मांस उत्पादनात घट दिसून येते. कोंबड्यांच्या योग्य वाढीसाठी १८ ते २१ अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते परंतु त्या २८ ते ३० अंश सेल्सिअस पर्यंतचे तापमान सहन करू शकतात. मात्र ३० अंश सेल्सिअसच्या वरती तापमान गेल्यास त्याचा त्यांच्या उत्पादन आणि प्रजोत्पादनावर विपरीत परिणाम होतो. बाह्य तापमान ३५ अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास प्रति अंश सेल्सिअस तापमान वाढीने ५ टक्के उत्पादन घट होते. जास्त तापमानात कोंबड्यांमध्ये खालील प्रमाणे उष्माघाताची लक्षणे आढळतात.

उष्माघाताची लक्षणे : कोंबड्या तोंडावाटे श्वास घेतात, तोंडाची उघडझाप करून धापा टाकतात. त्वचा रखरखीत होते, रंगामध्ये बदल दिसून येतो. पाणी जास्त पितात. भूक मंदावते. पोट जमिनीला घासतात, डोळे बंद करतात, हालचाल मंदावते, सुस्त राहतात. अंडी उत्पादनात घट होते, अंड्याचे वजन कमी होते. अंड्याच्या बाहेरील कवचाची गुणवत्ता कमी होते. शारीरिक वजनात लक्षणीय घट होते, मांसल कोंबड्यांचे वजन कमी होते. प्रजोत्पादन यावर उष्णतेचा विपरीत परिणाम होतो.



रोगप्रतिकार शक्तीही कमी होते, त्यामुळे आजारास बळी पडतात. खाद्याचे मांसात वा अंड्यात रूपांतर क्षमता कमी होते. कोंबड्या भिंतीच्या आडोशाला पडून राहतात. काही कोंबड्या पिण्याच्या पाण्याच्या भांड्याजवळ थंड जागेत मान वाकवून बसतात. शरीराचे तापमान कमी करण्यासाठी व शरीरात थंडपणा आणण्यासाठी पंख शरीरापासून दूर पसरवितात. दीड किलो पेक्षा अधिक वजनाच्या कोंबड्यांना दुपार ते संध्याकाळच्या वेळी ताप येतो. लालसर होऊन मरतात.उपाययोजना : शेड बांधताना घराची लांबी पूर्व-पश्चिम ठेवावी. वायुवीजन व्यवस्था सक्षम असावी. उन्हाळ्यात गादीसाठी लाकूड भुश्याऐवजी भाताचे तूस किंवा भुईमुग टरफलांचा वापर करावा. गादी म्हणून वापरात येणार्या तूसाची जाडी कमी (१ ते १.५ इंच) करावी. कोंबड्यांची संख्या किमान १० टक्क्यांनी कमी करावी. थंड, स्वच्छ, ताजे पिण्यायोग्य पाणी मुबलक प्रमाणात पुरवावे. पिण्याच्या पाण्याची भांडी संख्या दुप्पट वाढवावी. पिण्यासाठी क्लोरीनयुक्त पाण्याचा वापर करावा. यामुळे पाण्यातून होणारे आजार टाळता येतील. पिण्याच्या पाण्यामधून जीवनसत्व (क, ई), सेलेनीअम यांचा वापर करावा. त्यामुळे उष्णतेचा ताण कमी होईल. पिण्याच्या पाण्याची टाकी शेडमध्ये विशिष्ट उंचीवर बसवावी. बाहेरच्या बाजूस बसवली असेल तर त्यास बारदानाची पोती गुंडाळून त्यावर थंड पाणी टाकावे, जेणेकरून आतमधील पाणी थंड राहण्यास मदत होईल. ब्रॉयलर कोंबडीच्या खाद्यात मुख्य ऊर्जा स्रोत म्हणून वनस्पती तेलाचा ४ ते ५ टक्के या प्रमाणात वापर करावा. अंडी देणाऱ्या कोंबडीच्या खाद्यात खाण्याचा सोडा वापरावा. अंडी देणाऱ्या कोंबडीच्या खाद्य भांड्यात टाकलेल्या खाद्य पृष्ठभाग यावरती शिंपले अथवा मार्बलचे तुकडे थोड्या प्रमाणात पसरावेत. स्प्रिंकलर्स आणि फॉगर्स यांचा वापर हा सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंतच्या दरम्यान दर १ ते २ तासांनी करावा. खाद्य देण्याचे एक वेळापत्रक ठरवून घ्यावे. त्याचे काटेकोरपणे पालन करावे. खाद्य दिल्यानंतर साधारणतः अर्धा ते दीड तासात कोंबड्यांच्या शरीर तापमानात वाढ होते. यामुळे त्यांच्यावरील उष्णतेचा ताण वाढतो, म्हणून दुपारचे खाद्य देणे टाळावे. बाजूच्या भिंतीच्या जाळीवरती बारदान पोती लावावीत. त्यावर स्प्रिंकलर्सचे पाणी पडेल याची सोय करावी. शेड नेटचा वापर करता येतो. शक्य असल्यास शेडमध्ये कुलर किंवा पंखा याचा वापर करावा. छतावर सूर्यप्रकाश परावर्तित करणाऱ्या पत्र्यांचा वापर करावा जेणेकरून शेडच्या आतील तापमान कमी राखण्यास अधिक मदत होते.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

३२०: आजच्या दिवशी चंद्रगुप्त मौर्य ला २१ व्या वर्षी पाटलीपुत्राचा सम्राट बनविल्या गेले.
१९७५: गुजरात येथे देशातील पहिले पतंग संग्रालय ''शंकर केंद्र'' गुजरात च्या अहमदाबाद येथे स्थापन केले.
१९०९: सिनेमाकलर या पहिल्या रंगीत चित्रपट प्रथम पॅलेस थिएटर, लंडन मध्ये प्रदर्शित झाला.
१९२८: बाटून ख्रिश्चन बनलेल्या पिढीजात ख्रिश्चनांना परत हिंदु धर्मात घेण्याची सुरुवात झाली.
१९७६: वि. स. खांडेकर यांना (ययाती कादंबरीसाठी) मराठीतील पहिला ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान
१९७६: मराठीतील पहिला ज्ञानपीठ पुरस्कार वि. स. खांडेकर यांनी मिळाला
१९८४: 'इन्सॅट-१-इ' हा संपूर्ण भारतीय बनावटीचा बहुउद्देशीय भारतीय उपग्रह राष्ट्राला समर्पित
१९९५: बारिंग्ज बँक ही इंग्लंडची सर्वात जुनी गुंतवणूक बँक दिवाळखोरीत निघाली.
१९९८: परळी-वैजनाथ येथील औष्णिक केन्द्राने एका दिवसात १४.७०९ दशलक्ष युनिट विजेची निर्मिती करून वीजनिर्मितीचा (भारतातील व त्याकाळचा) नवा विक्रम नोंदवला.
१९९९: आशिया खंडातील पहिले तरंगते हॉटेल अशी ख्याती असलेले ठाण्याच्या घोसाळे तलावातील 'अभिरुची हॉटेल' आगीत भस्मसात झाले.
१९९९: आंतरराष्ट्रीय जनुक अभियांत्रिकी व जैवतंत्रज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ प्रा. जी. पी. तलवार यांची मानाच्या समजल्या जाणार्या मास्त्रोनी-सीगल पुरस्कारासाठी निवड
२००६: रशिया आणि इराण यांच्यात अणुशक्ती संशोधन या विषयी तोडगा काढण्यात आला.
२००८: भारताने समुद्रातून सक्षम बैलिस्टिक मिसाइल ची चाचणी केली, जे मिसाईल अण्वस्त्रे घेऊन जाण्याची क्षमता ठेवते.
२०१९: आजच्या दिवशी पुलवामा हल्ल्याच्या १२ दिवसानंतर भारतीय वायुसेनेने पाकिस्तान मध्ये जाऊन आतंकवाद्यांचे लाँचपॅड उडवून टाकले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६३०: गुरू हर राय शिखांचे ७ वे गुरू (मृत्यू: ६ आक्टोबर १६६१)
१८०२: व्हिक्टर ह्यूगो - जागतिक कीर्तीचे फ्रेन्च कादंबईकार, कवी आणि लेखक (मृत्यू: २२ मे १८८५)
१८२९: लेव्ही स्ट्रॉस - अमेरिकन उद्योजक (मृत्यू: २६ सप्टेंबर १९०२)
१८६६: हर्बर्ट डाऊ - अमेरिकन उद्योगपती (मृत्यू: १५ आक्टोबर १९३०)
१८७४: सूरसिंह तख्तसिंह गोहिल ऊर्फ 'कलापि' - प्रसिद्ध गुजराथी (सौराष्ट्र) कवी, त्यांचा 'कलापिनो केकारव' हा काव्यसंग्रह खूप गाजला आहे. (मृत्यू: १९००)
१९०८: भारतीय लेखिका लीला मुजुमदार यांचा जन्म. (मृत्यू: ५ एप्रिल २००७)
१९२२: मनमोहन कृष्ण - चरित्र अभिनेता (मृत्यू: ३ नोव्हेंबर १९९०)
१९३७: मनमोहन देसाई - चित्रपट निर्माते, दिग्दर्शक (मृत्यू: १ मार्च १९९४)
१९४६: पत्रकार, लेखक, तसेच पद्मश्री पुरस्काराने सन्मानित असलेल्या मृणाल पांडे यांचा जन्म.
१९५७: भारतीय रिझर्व्ह बँक चे गवर्नर शक्तीकांत दास यांचा जन्म.
१९५९: लोकसभेचे सदस्य संजय शामराव धोत्रे यांचा जन्म.
१९८७: भारताच्या संविधान समितीचे सल्लागार बेनेगल नरसिंह राव यांचा जन्म.
१९९४: भारतीय कुश्तीपटू बजरंग पुनिया यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७१२: दिल्लीचा सातवा बादशाह बहादुर शाह (प्रथम) चे निधन.
१८७७: मेजर थॉमस कॅन्डी कोशकार व शिक्षणतज्ज्ञ, मराठीत विरामचिन्हे वापरण्यास त्यांनी प्रथम सुरूवात केली, इंडियन पीनल कोडचे त्यांनी मराठीत भाषांतर केले. (जन्म: १३ डिसेंबर १८०४)
१८८६: नर्मदाशंकर दवे ऊर्फ 'नर्मद' गुजराथी लेखक व समाजसुधारक, त्यांनी गुजराथी भाषेचा शब्दकोश सर्वप्रथम तयार केला. (जन्म: २४ ऑगस्ट १८३३)
१८८७: भारतीय डॉक्टर - आनंदी गोपाळ जोशी यांचा जन्म. (जन्म: १५ मार्च १८६५)
१९०३: गटलिंग गन चे निर्माते रिचर्ड जॉर्डन गटलिंग यांचे निधन. (जन्म: १२ सप्टेंबर १८१८)
१९३७: एल. के. अनंतकृष्ण अय्यर - दक्षिण भारतातील जातिजमातींची सखोल पाहणी करुन माहिती गोळा करणारे मानववंशशास्त्रज्ञ (जन्म: ६ जुलै १८६२)
१९६६: महान क्रांतिकारक, प्रतिभासंपन्न कवी, नाटककार, प्रभावी वक्ते व लेखक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे दीर्घ प्रायोपवेशनानंतर निधन (जन्म: २८ मे १८८३)
२०००: बा. म. तथा 'रावसाहेब' गोगटे - बेळगाव येथील उद्योगपती (जन्म:)
२००३: राम वाईरकर - व्यंगचित्रकार, महाराष्ट्रातल्या बालवाचकांना सुपरिचित असलेला फास्टर फेणे वाईरकर यांच्या कुंचल्यातून उतरला होता.
२००४: शंकरराव चव्हाण - केंद्रीय अर्थमंत्री, गृहमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री (जन्म: १४ जुलै १९२०).
२००५: अमेरिकन संगणकशास्त्रज्ञ व मॅकिन्टॉश चे निर्माते जेफ रस्किन यांचे निधन. (जन्म: ९ मार्च १९४३)
२०१०: चंडीकादास - अमृतराव तथा नानाजी देशमुख - समाजसुधारक व संघप्रचारक, लोकसभा व राज्यसभा सदस्य, डी. लिट. (पुणे विद्यापीठ १९९७), पद्मविभूषण. त्यांनी रचनात्मक ग्रामीण विकासाला वेगळी दृष्टी दिली. डोमरी येथील सोनदरा गुरुकुलम, ग्रामोदय विश्वविद्यालय, उदयमिता विद्यापीठ, आयुर्वेद विद्याप्रतिष्ठान, गोमाता संगोपन प्रकल्प अशा विविध संस्थांमार्फत विधायक कार्यक्रमांचे जाळे त्यांनी विकसित केले. (जन्म: ११ आक्टोबर १९१६ कडोळी, परभणी, महाराष्ट्र).

# ऐतिहासिक वारसा असलेल्या बारवांचे संवर्धन करणे ही नागरिकांची जबाबदारी -जिल्हाधिकारी

जालना। प्रतिनिधी

अंबड शहरातील ऐतिहासिक पुष्करणी बारव दुरुस्तीसाठी आमदार नारायण कुचे यांनी अडीच कोटी रुपयाची निधी विशेष प्रयत्न करून निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे नगरपालिका च्या नगराध्यक्षा देवयानी केदार दादा कुलकर्णी व सर्व नगरसेवक च्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. या अंबड शहरातील पुरातन व ऐतिहासिक वारसा लाभलेल्या पुष्करणी बारव येथे आज जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी बारवांच्या जतन व संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या विकास आराखड्याचा सविस्तर आढावा घेतला.



पुष्करणी बारव ही अंबड शहराच्या ऐतिहासिक वैभवाची साक्ष देणारी वास्तू असून, तिचे जतन करणे अत्यंत आवश्यक आहे. या बारवेसाठी मंजूर निधीतून बारव परिसराचे सुशोभीकरण, संरक्षक भिंतींची दुरुस्ती, पायऱ्यांची मजबुतीकरण कामे, पाणी साठवण क्षमतेत सुधारणा, तसेच पर्यटकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उभारण्याचा समावेश आहे. पाहणीदरम्यान जिल्हाधिकारी मित्तल यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना कामाचा दर्जा उच्च प्रतीचा राखण्याच्या सूचना दिल्या. ऐतिहासिक वास्तूंची मूळ रचना अबाधित ठेवूनच संवर्धनाची कामे करण्यात यावीत, तसेच कामे निश्चित कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच बारवेभोवती असलेले अतिक्रमण तात्काळ काढणेबाबत निर्देश देण्यात आले.यावेळी त्या म्हणाल्या की, ''ऐतिहासिक वारसा ही आपल्या संस्कृतीची ओळख आहे. बारवांसारख्या जलसंपत्तीच्या प्राचीन वास्तू या आपल्या पूर्वजांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहेत. त्यांचे जतन व संवर्धन करणे ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.'' नागरिकांनीही अशा वारसा स्थळांची स्वच्छता व संरक्षण यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. पाहणीवेळी उप विभागीय अधिकारी अंबड उमाकांत पारधी, तहसीलदार विजय चव्हाण, नगराध्यक्ष श्रीमती देवयानी कुलकर्णी, सहायक संचालक पुरातत्त्व विभाग श्रीमती जया वाहणे, स्वच्छता सभापती सचिन खरात, बांधकाम सभापती रामशेठ लांडे, नगर सेवक संदिप खरात, केदार कुलकर्णी, फिरोज शेख, माजी नगराध्यक्ष सुरेश गुढे,मुख्याधिकारी नगर परिषद अंबड मनोज उर्किडे,पुरातत्त्व विभागाचे इंजिनिअर रामचंद्र निपाणे, महावारसा समिति सदस्य रामभाऊ लांडे यांची उपस्थिती होती.पुष्करणी बारव संवर्धन प्रकल्पामुळे अंबड शहराच्या पर्यटन विकासाला चालना मिळणार असून, स्थानिकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# मुंबई येथे संगणक परिचालक संघटनेचे आंदोलन



जालना। प्रतिनिधी

मुंबई येथे संगणक परिचालक संघटनेचे आंदोलन सुरू आहे. या ठिकाणी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी भेट देऊन संगणक परिचालकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी संगणक परिचालकांच्या मागण्या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्य सरकारकडे मांडणार असल्याचे सांगितले. तसेच संगणक परिचालकांचे प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, असे आश्वासन आमदार बबनराव लोणीकर यांनी दिले. या आंदोलनात राज्यभरातून तसेच जालना जिल्ह्यातूनही मोठ्या संख्येने संगणक परिचालक सहभागी झाले आहेत.

राज्यातील हजारो संगणक परिचालक अनेक वर्षांपासून ग्रामपंचायत स्तरावर विविध शासकीय ऑनलाइन व ऑफलाइन सेवा नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. मात्र मानधनवाढ, सेवा सुरक्षा आणि कर्मचारी दर्जा यांसारख्या प्रलंबित मागण्यांमुळे त्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. राज्य सरकारने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून संगणक परिचालकांना न्याय देणे आवश्यक असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी आमदार बबनराव लोणीकर यांचे आभार मानले व त्यांच्या मागण्यांकडे लक्ष वेधले.

## || थोडक्यात



### मयत पूजकाचे नाव सात बारावरून कमी करण्याची मागणी

मंठा। प्रतिनिधी : तालुक्यातील उमरखेड येथील गट क्रमांक २६७ श्री रामचंद्र देवस्थान मारोती मंदिर इमान शेत जमिनी मधील सातबारा वरील इतर अधिकारातील मयत प्रभाकर हरीभाऊ यांचे नाव वगळण्यात यावे यासाठी ग्रामस्थांच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, प्रभाकर हरीभाऊ हे मयत झालेले असून त्यांचे वारस गावात वास्तव्यास नाहीत आणि त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटूंबातील सदस्य हे मंदीराची पुजा आर्चा करीत नाहीत त्यामुळे मौंजे उमरखेडा ता. मंठा गट नं. २६७ (श्री रामचंद्र देवस्थान उमरखेडा) मयत पुजक आर्चक नामे प्रभाकर हरीभाऊ हे नाव ७/१२ वरुन कमी करण्यात यावे असे म्हटले आहे.सदरील निवेदनावर सुनील जोशी,निलेश जोशी,बालासाहेब कुलकर्णी,किशोर कुलकर्णी,प्रताप जाधव,नितीन राठोड,हर्षद कुलकर्णी,प्रमोद कुलकर्णी,सुधीर खडके,सागर जाधव,अशामती मस्के,मीरा पंढरे, अशामती जाधव, शोभा पवार यांच्यासह असंख्य गावकऱ्यांच्या सह्या केलेले आहेत.

### पारनेर परीक्षा केंद्रास जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची भेट

अंबड । प्रतिनिधी : अंबड तालुक्यातील आदर्श स्कूल



पारनेर येथील परीक्षा केंद्रास जिल्हाधिकारी यांनी आज अचानक भेट देऊन सुरू असलेल्या इयत्ता बारावीच्या परिक्षेची पाहणी केली. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता, शिस्त आणि गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. भेटीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी परीक्षा कक्षांची पाहणी करून विद्यार्थ्यांच्या आसनव्यवस्थेची, प्रश्नपत्रिका वितरणाची तसेच देखरेख व्यवस्थेची माहिती घेतली.तसेच विद्यार्थांना उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या सोयीसुविधांची पाहणी केली. केंद्रप्रमुख व पर्यवेक्षकांशी संवाद साधून परीक्षा सुरळीत व नियमानुसार पार पाडण्याबाबत आवश्यक सूचना दिल्या. परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.यावेळी संस्थाचालक अशोक लांडे,केंद्र संचालक श्री गाढे व पर्यवेक्षीय यंत्रणेतील कर्मचारी उपस्थित होते.

### जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे आयोजन

जालना/प्रतिनिधी: जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची महत्त्वाची बैठक शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीचे अध्यक्षपद जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल या भूषविणार असून यात ग्राहकांच्या विविध समस्यांवर चर्चा केली जाणार आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी कळविले आहे की, या समितीवर नियुक्त सर्व शासकीय आणि अशासकीय सदस्यांनी बैठकीस वेळेत उपस्थित राहणे अनिवार्य आहे. जालना जिल्ह्यातील ज्या सामान्य नागरिकांच्या ग्राहक हिताशी संबंधित काही तक्रारी किंवा समस्या असतील, त्यांनी या बैठकीच्या दिवशी प्रत्यक्ष उपस्थित राहून आपला लेखी अर्ज सादर करावा. प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसल्यास किंवा आगाऊ तक्रार नोंदवायची असल्यास, प्रशासनाने डिजिटल सुविधेचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. नागरिक जालना जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर (..) उपलब्ध करून देण्यात आलेल्या ग्राहक तक्रार पोर्टल (फॉर्म) माध्यमातून आपल्या समस्या नोंदवू शकतात. जास्तीत जास्त ग्राहकांनी आपल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी या संधीचा लाभ घ्यावा.

# प्रधानमंत्री विश्वकर्मा अंतर्गत तीन दिवसीय विक्री व प्रदर्शनाचे आयोजन

जालना। प्रतिनिधी

जालनातील पारंपरिक कारागीर आणि शिल्पकारांच्या हाताला हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी भारत सरकारच्या 'एमएसएमई' मंत्रालय आणि महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना प्रदर्शन व विक्री' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जुना जालना भागातील मस्तगढ येथील शितल गार्डन येथे दि.२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान हे प्रदर्शन भरणार असून यात ५० हून अधिक वैविध्यपूर्ण स्टॉल्सचे आकर्षण असणार आहे. तरी स्थानिक कारागिरांच्या मेहनतीला दाद देण्यासाठी आणि स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी जालना जिल्ह्यातील नागरिकांनी या प्रदर्शनाला मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन एमएसएमई विकास कार्यालयाचे सहायक संचालक राहुलकुमार मिश्रा यांनी आज पत्रकार परिषदेत केले. या पत्रकार परिषद मध्ये व्यापारी महासंघाचे अध्यक्ष हस्तीमल बंब, संजय भालेराव, यावेळी पत्रकार परिषद मध्ये माहिती देताना ते म्हणाले की पीएम विश्वकर्मा अंतर्गत जालना जिल्ह्यामध्ये २ हजार७६१ लाभार्थ्यांना लोन मंजुरी दिली आहे. अशी माहिती देण्यात आली आहे. या





प्रदर्शन विक्रीचे उदघाटन आज बुधवार, दि.२५ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता शितल गार्डन जालना येथे महापौर वंदना मगरे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., एमएसएमई विकास कार्यालयाचे सहायक संचालक राहुलकुमार मिश्रा यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून त्यांचे मार्गदर्शनही मिळणार आहे.पंतप्रधान विश्वकर्मा योजनेतील लाभार्थ्यांच्या उत्पादनांना थेट व्यासपीठ मिळवून देणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये सुतार, लोहार, सुवर्णकार, कुंभार, मूर्तिकार, मोची, चटई, झाडू आणि खेळणी निर्माते अशा विविध १८ प्रकारच्या पारंपरिक कारागिरांना आपली कला सादर करण्याची आणि वस्तूंची थेट विक्री करण्याची नि:शुल्क संधी देण्यात आली आहे. केवळ विक्रीच नव्हे, तर उद्योजकांना तांत्रिक बळ देण्यासाठी या तीन दिवसांत ब्रँड नोंदणी आणि बौद्धिक संपदा या विषयावर विशेष मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. तसेच २६ फेब्रुवारी रोजी स्वयंरोजगार कार्यशाळा आणि संध्याकाळी 'संगीत संध्या' या सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद नागरिकांना घेता येईल. असेही त्यांनी यावेळी सांगितले. तीन दिवसीय प्रदर्शन सकाळी ११ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत खुले असून सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य राहणार आहे. जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक मंगेश केदार, खादी व ग्रामोद्योग अधिकारी बी. के. वाघमारे, कौशल्य विकास विभागाचे अधिकारी यांची यावेळी उपस्थिती होती. या उपक्रमाला लघु उद्योग भारती आणि दलित भारतीय वाणिज्य एवं उद्योग चेंबर (डिक्की), भीम उद्योग अभियान, अखिल भारतीय व्यापारी परिसंघ जालना ईकाईसह विविध व्यापारी संघटनांनी पाठिंबा दर्शविला आहे.

# पाणीपुरवठा जलवाहिन्यांवरील लोखंडी गडरची चोरी

जालना । प्रतिनिधी

जालना शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीवरील महत्त्वाच्या तांत्रिक साहित्याची चोरी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यामुळे नवीन जालना शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून, महानगरपालिका प्रशासनाने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.



संत गाडगेबाबा जलाशय (घाणेवाडी) ते जलशुद्धीकरण केंद्र यादरम्यान असलेल्या मुख्य पाईपलाईनवर 'कन्हैयानगर' भागातील नाल्यावरील पुलावर २० फुटाचे लोखंडी गडर बसवण्यात आले होते. २३ फेब्रुवारी २०२६ च्या रात्री अज्ञात चोरट्यांनी हे गडर चोरून नेले. या साहित्याची अंदाजे किंमत १५,००० रुपये असून त्याचे वजन दीड क्विंटलच्या आसपास आहे. सदरील चोरी करताना मोठी दुर्घटना सुद्धा होऊ शकली असती. सदर गडर हे थेट चालू असलेल्या पाणीपुरवठा पाईपलाईनवर असल्याने, या चोरीमुळे तांत्रिक अडथळा निर्माण झाला आहे. परिणामी, नवीन जालना शहरातील पाणीपुरवठा पूर्णतः विस्कळीत होऊ शकतो. महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने याप्रकरणी चंदनझिरा पोलीस स्टेशन येथे अज्ञात व्यक्ती विरुद्ध फिर्याद दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



जालना : यशवंत प्रतिष्ठानच्यावतीने ऋचिका खोत प्रस्तुत 'किर्तावणीः वारी आडवाटंच्या विठोबाची' या भक्तीमय प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे अंबड येथील पं. गोविंदराव जळगावकर नाट्यगृहात अप्रतिम सादरीकरण झाले. यावेळी ऋचिका खोत यांचे स्वागत करतांना डॉ. कालिंदा उढाण व कार्यक्रमास उपस्थित प्रमुख मान्यवर होते

# गरजवंतांनी जातीची कुंपण तोडून एकत्र आले पाहिजे!

## मराठा- ओबीसी आरक्षण'' टॉक शोमध्ये मान्यवरांचा सूर

अंबड । प्रतिनिधी

संत, महामानवांनी जात व्यवस्था संपविणारी आंदोलने केली. आज संतांची नावे घेऊन शैतानाची दुनिया वावरतेय, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर विझत चाललेल्या जाती पुन्हा उफाळून येऊ लागल्यात , मध्यमवर्गीयांत जातीचा अभिनिवेश जास्त आहे. गाव पातळीवर छोटे घटक भेदरलेल्या अवस्थेत असून त्यांना सुरक्षित करण्याची गरज आहे. सर्वच जातीचे प्रश्न सारखे आहेत, गरिबांचे वाद नाहीत, गावगाड्यातील माणसं आजही संवाद करतात. अशा स्थितीत समन्वयी तोडगा काढायचा असेल तर दोन्ही पक्षांनी राजकारण विरहित एकत्र येऊन संवादाची भूमिका घ्यावी, जातीचा अभिनिवेश, कुंपण तोडून एकत्र आले पाहिजे. महाराष्ट्र कसा चालवायचा याचा निर्णय बहुसंख्य मराठा समाजाने घ्यावा आता जातीचे नको तर माणसांचे नेते व्हावे असा सूर तज्ञ मान्यवरांनी व्यक्त केला.तथापि जातीचा नव्हे तर वर्ग व्यवस्थेचा हा लढा आहे .सर्व जाती -धर्मातील वंचितांनी एकत्र येऊन सैद्धांतिक मांडणी केली पाहिजेत



.शासनाने शिक्षणावरील खर्च वाढवला आणि शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य हमीभाव दिला तर आरक्षणाची गरजच राहणार नाही अशी रोखठोक भूमिका सुद्धा मांडण्यात आली.

यशवंत प्रतिष्ठान तर्फे गोविंदराव जळगावकर नाट्यगृहात आयोजित व्याख्यानमालेच्या समारोप प्रसंगी सोमवारी ( ता.२३) '' मराठा -ओबीसी आरक्षण प्रश्न :नको वाद हवा संवाद'' या विषयावर टॉक शो मध्ये मानसिंह पवार ,दीपक बोऱ्हाडे ,प्रा.श्रीकांत देशमुख ,प्रा . यशपाल भिंगे यांनी सध्याच्या स्थितीवर परखडपणे आपली मते व्यक्त केली. मानसिंह पवार यांनी छत्रपती संभाजी नगर सोडले तर मराठवाडा मानवनिर्देशांकात आदिवासी क्षेत्रापेक्षा मागे आहे . सामाजिक, आर्थिक सुधारणांपासून कोसो दूर असलेल्या मराठवाड्याला विशेष क्षेत्र घोषित करून सर्व घटकांना आरक्षण द्यावे. स्वातंत्र्य टिकवायचं असेल तर दोन्ही पक्षांनी राजकारण विरहित एकत्र येऊन संवादाची भूमिका घ्यावी मला वापरता कामा नये अशी दक्षता घेतली पाहिजेत असे मत मानसिंह पवार यांनी मांडले. दीपक बोऱ्हाडे म्हणाले, महापुरुषांच्या नावाने जातीय तेढ निर्माण केले जातेय ,जातीय अस्मिता टोकाला गेली असून गढूळ राजकारण समाज जीवनासाठी घातक आहे. पुढील काळात जातीय दंगली वाढतील अशी भिती त्यांनी व्यक्त केली .तथापि मनोज जरांगे पाटील ,लक्ष्मण हाके यांच्या मागे समाजाची मोठी ताकद असून दोघांनी आपसात न भांडता एकत्र येऊन आरक्षणाची मर्यादा ७० टक्क्यांवर नेण्यासाठी लढा द्यावा अशी अपेक्षा बोऱ्हाडे यांनी व्यक्त केली. प्रा.श्रीकांत देशमुख यांनी व्यवस्थेच्या विद्रुपीकरणाचा हा कालखंड असून जात व्यवस्था आहे पण तणाव नाही, विखराचे युग आहे. अशा स्थितीत ''खरा तो एकची धर्म ''हे मातृ हृदय आपण समजून घ्यावं, जात ही ओळख भारतीय म्हणून असावी. विकसित राष्ट्रांमध्ये आरक्षण नाही आरक्षण हा सामाजिक ,सांस्कृतिक मुद्दा आहे तो विकासाचा नॅशनल हायवेच काय साधा उड्डाणपूल सुद्धा नाही . केवळ स्त्री आणि पुरुष या दोनच जाती आहेत असा विशाल दृष्टिकोन मांडत कृषी औद्योगिक समाजाची स्थापना करावी, शेतीवर आधारित कारखाने ,शेतमालाला हमीभाव देण्याची गरज असल्याचे प्रा.देशमुख यांनी अधोरेखित केले. प्रा.यशपाल भिंगे यांनी जात ही सर्वात मोठी अंधश्रद्धा आहे. सर्व शेतकरी जाती एकाच वंशाचे आहेत हे महात्मा फुलेंनी सांगितलेल अद्यापपर्यंत आम्हाला कळाले नाही. पुढील काळात जातीचा अभिनिवेश टिकणार नाही. जागतिकीकरण, भांडवलशाहीत नोकऱ्या संपल्या आहेत. बहुजन समाजातील गरजवंतांनी जातीची माणसं सोडून मतदान करावं, बुद्धिवंत,मध्यमवर्गीयांनी जातीचा अभिनिवेश फेकून एकत्र येण्याची भूमिका घ्यावी असे मत प्रा.भिंगे यांनी मांडले. प्रास्ताविक ॲड.संजय खोरे यांनी केले. निवेदन प्रा. डॉ.समाधान इंगळे यांनी तर गौरी खोरे यांनी आभार मानले. यावेळी प्रतिष्ठानच्या सदस्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

cmyk

दैनिक
राज्य लोकतंत्र



# जीएसटी अधिकारी सचिन जाधवर मृत्यू प्रकरणी कुटुंबियांचे अमरण उपोषण

## पोलीस उपअधीक्षकांच्या आश्वासनानंतर उपोषण मागे

बीड । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसापूर्वी जीएसटी अधिकारी सचिन जाधवर यांचा संशयास्पद मृत्यू झाला होता. या प्रकरणातील वरिष्ठ अधिकारी प्रदीप फाटे याला अटक करण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते. या उपोषणकर्त्यांना उशिरा पोलीस अधीक्षक श्रीमती पवार यांनी सोमवार पर्यंत आरोपींना अटक करण्यात येईल असे आश्वासन दिल्यानंतर हे आमरण उपोषण कुटुंबीयांनी मागे घेतले. विशेष




म्हणजे हे कुटुंब पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उन्हात उपोषण करत होते. त्यांना सावलीसाठी मंडप लावण्यासही पोलिसांनी मज्जाव केला. या प्रकरणाच्या संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधुन येत आहेत.

गेल्या काही दिवसांपूर्वी दिनांक १७ जानेवारी रोजी जीएसटी अधिकारी सचिन जाधवर यांचा धुळे- सोलापूर हायवे जवळ कपिलधार वाडी फाट्याजवळ सशंयास्पदरीत्या एका कार मध्ये मृतदेह आढळून आला होता. ही आत्महत्या नसून हा नियोजित खुन आहे असा आरोप सचिन जाधवर यांच्या कुटुंबियांनी केला होता. याप्रकरणी पोलिसांनी तब्बल पाच दिवसांनी २३ जानेवारी रोजी गुन्हा दाखल केला. तर दि.१३ फेब्रुवारीला वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आरोपीला अटक करण्याचे निर्देश दिलेले असतानाही आणि न्यायालयाने अकरा फेब्रुवारीला यातील संशयित फरार आरोपी प्रदीप फाटे यांचा अटकपूर्व जामीन नाकारलेला असतानाही पोलिसांनी या आरोपीला अटक केली नाही. उलट आरोपीची पाठराखण केली. असा आरोप कुटुंबियांनी केला आहे. या प्रकरणातील आरोपी प्रदीप फाटेला त्वरित अटक न केल्यास सचिन जाधव यांचे कुटुंबीय आणि नातेवाईक २५ फेब्रुवारीपासून पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचा इशाराही देण्यात आला होता. इशारा दिल्याप्रमाणे कुटुंबीय आणि नातेवाईक पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषणाला बसले.

पान ३ वर

### आरोपींना मोकळीक मात्र फिर्यादींवर अन्याय

सचिन जाधव यांच्या मृत्यूप्रकरणी प्रदीप फाटेला पोलिसांना अटक करता आली नाही. महिना झाला तरी प्रदीप फाटे यांना सापडत नाही. मात्र न्याय मागणीसाठी लोकशाही मार्गाने कुटुंबीय उपोषण करत असताना त्यांना सावलीसाठी पोलीस अधिकाऱ्यांनी मंडपही टाकू दिला नाही. म्हणजे आरोपींना पायघड्या आणि फिर्यादीवर अन्याय अशी बीड पोलिसांची कामगिरी आहे .

### पोलीस अधिकारी नातेवाईकांमध्ये बाचाबाची

बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बल्लाळ पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करत असलेल्या ठिकाणी आले. या ठिकाणी त्यांनी आम्हाला आरोपी पकडण्यासाठी वेळ द्या. तुम्ही आम्हाला डिस्टर्ब करू नका. नाहीतर आम्हाला तुमच्यावरच गुन्हे दाखल करावे लागतील असा दम दिल्याने सचिन जाधवर यांचे नातेवाईक आणि बल्लाळ यांच्यामध्ये बाचाबाची झाली. पोलीस फिर्यादीवर दबाव आणत आहेत असा प्रकार समोर आल्याने या प्रकरणी नागरिकांमध्ये उलट सुलट चर्चा चालू आहे.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध पोक्सो तसेच अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

शहरातील एका घरात बांधकाम कामगार म्हणून काम करणारा ओंकार संतोष दहिभाते (वय २३ वर्षे) याने चौदा वर्षीय अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याची घटना दि. २ फेब्रुवारी रोजी घडली होती. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईच्या फिर्यादीवरून शहर पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपास सुरू करून शोधमोहीम राबविली असता दि.२१ फेब्रुवारी रोजी मुलगी व आरोपी पुणे येथील आळंदी परिसरात आढळून आले. त्यानंतर दोघांना ताब्यात घेण्यात आले. मुलीला विश्वासात घेऊन चौकशी केली असता आरोपीने गैरप्रकार व अत्याचार केल्याचे मुलीने जबाबात नमूद केले. त्यानंतर संबंधित कलमांमध्ये वाढ करून पोक्सो व अत्याचाराचे गुन्हे दाखल करण्यात आले. दि.२३ फेब्रुवारी रोजी आरोपीस न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक एस. एन. राठोड हे करत आहेत.

# आ.संदिप क्षीरसागरांनी घेतली महसुल मंत्री, बांधकाम मंत्र्यांची भेट

## अप्पर तहसिल कार्यालय तसेच राजुरी-खरवंडी राष्ट्रीय महामार्गाचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याची केली मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांविषयी आ.संदिप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे महसुल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे तसेच राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.शिवेंद्रसिंह राजे भोसले यांची बुधवारी (दि.२५) रोजी मुंबई येथे भेट घेतली.

बीड विधानसभा मतदारसंघातील चौसाळा येथे अप्पर तहसिल कार्यालय सुरू करण्याबाबत राज्याचे महसुल





मंत्री ना.चंद्रशेखर बानवकुळे यांना आ.संदीप क्षीरसागर यांनी निवेदन दिले. चौसाळा हे गाव शहरापासुन सुमारे ४० कि.मी. अंतरावर आहे. बीड तालुक्याचा मोठा भाग हा चौसाळा परिसराशी जोडलेला आहे. परंतु नागरिकांना महसुल व प्रशासकीय कामांसाठी बीड शहराकडे जावे लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होत आहे. या पाश्वभुमीवर प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता यावी. लांबच्या गावांना कमी अंतरात शासकीय सेवा मिळावी. शेतकरी, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक व सर्वसामान्यांना दिलासा मिळावा. महसुल विभागाची कार्यक्षमता वाढावी या उद्देशाने चौसाळा येथे अप्पर तहसिल कार्यालय तातडीने सुरू करण्याची मागणी आ.संदिप क्षीरसागर यांनी महसुल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. त्यावर मा.मंत्री महोदयांनी सदरील विषयावर सकारात्मक भुमिका दर्शवत लवकरात लवकर योग्य निर्णय घेण्यात येईल असे आश्वासित केले. यासोबतच बीड विधानसभा मतदारसंघातील खरवंडी ते नवगण राजुरी दरम्यान राष्ट्रीय

पान ३ वर

# शहरातील लाईट सुरळीत ठेवा-खुर्शीद आलम

## लाईट संदर्भात तुतारी गटाने घेतली मुख्य अभियंताची भेट

बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील अनेक भागात लाईट सुरळीत नसल्याने अंधार पसरलेला दिसुन येत आहेत, अनेक भागात लाईट जाण्याचा आणि येण्याचा कोणताही वेळ राहिलेला नाही, महाराष्ट्र विद्युत मंडळाच्या गलथान कारभारामुळे शहरातील नागरिक त्रस्त झाले आहेत, सनासुधीच्या वेळेस सुद्धा लाईट सुरळीत मिळत नाही, शहरातील अनेक डि.पी. चे किटकॅट फुटुन



तुकडे तुकडे झालेले आहेत तर अनेक ठिकाणी कुजलेले खंबे असुन ते तुटून पडले तर मोठ्ठी जिवितहानी होण्याची शक्यता आहे तर अनेक ठिकाणी विद्युत तार लोंबकळत आहे त्यामुळे सुद्धा जिवितहानी होण्याची शक्यता आहे तर अनेक ठिकाणी विद्युत खंबे नसल्यामुळे लोकांना पाच पाचशे फुटांवरून विद्युत मिटर घ्यावे लागत आहेत, लोकसंख्या अनुसार डि.पी.नसल्याने व्होल्टेज कमी जास्त होऊन इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू जळुन जाते, अनेक वर्षांपासून ची विद्युत तारे कधी तुटून अंगावर पडेल याचा नेम नाही अश्या विविध तक्रारी घेऊन

पान ३ वर

# श्रीक्षेत्र बप्पाजी बाबा संस्थान येथे मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा, अनेक संत महंत उपस्थित राहणार

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे बांगरवाडा (पिंपरनई) येथील श्रीक्षेत्र बप्पाजी बाबा संस्थान वर भव्य दिव्य दगडी मंदिराचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. त्या निमित्त गुरुवार दिनांक ०५/०३/२०२६ रोजी सकाळी १० वा.भव्य दिव्य मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे.या मध्ये भगवान श्रीकृष्ण,तपोनिधी ईश्वर भारती,वाचासिद्धि श्रीसंत बप्पाजी बाबा, वैराग्यमूर्ती श्रीसंत वामनभाऊ, ऐश्वर्यसंपन्न श्रीसंत भगवान बाबा यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमाला श्री. हभप.महंत महादेव









भारती(श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान)श्री.महंत महादेवानंद भारती (अश्वलिंग संस्थान), यांची पवित्र उपस्थिती तसेच श्री.महंत लक्ष्मण महाराज मेंगडे(बंकटस्वामी संस्थान) श्री.ह.भ.प.महंत कृष्णा महाराज शास्त्री (चौथे उत्तराधिकारी, श्रीक्षेत्र भगवानगड), श्री.१००८ महंत त्रिविक्रम शास्त्री (गणेशानंद गड,पिंपळनेर),यांच्या शुभहस्ते हा कार्यक्रम पार पडणार आहे.कार्यक्रमाला महंत श्री तुकाराम भारती(बेलेश्वर संस्थान),श्री.परमानंद भारती महाराज(अश्वलिंग संस्थान) आदी संत महंत या सोहळ्याला उपस्थित राहणार आहे.

बीड तालुक्यातील

पान ३ वर

# जिल्ह्यात अवकाळी पावसाने पिकांचे प्रचंड नुकसान; पंचनामे करा, खा.सोनवणे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात २३ फेब्रुवारी रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे विविध भागांतील शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे त्वरित करण्यात यावेत, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. यासंदर्भात २५ फेब्रुवारी रोजी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले आहे.**



पत्रात म्हटले आहे, अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये रब्बी हंगामातील पिकांना फटका बसला आहे. अचानक झालेल्या पावसामुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकरी वर्ग अडचणीत सापडला आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील उभी पिके आडवी पडली असून उत्पादन घटण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळणे गरजेचे असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. महसूल व कृषी विभागामार्फत नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून शासनाकडे नुकसान भरपाईचा प्रस्ताव त्वरित सादर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील बाधित भागांचा तातडीने आढावा घेऊन पंचनाम्यांचे काम जलदगतीने पूर्ण करावे तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश संबंधित विभागांना देण्यात यावेत, अशी अपेक्षा खासदार सोनवणे यांनी व्यक्त केली आहे. अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असेही पत्रात म्हटले आहे.



## वकिलालाच मारहाण : जिल्ह्यातील ११ तालुक्याचे न्यायालयीन कामकाज बंद

बीड । प्रतिनिधी


बीड जिल्हा व सत्र न्यायालयात वकिलालाच मारहाण प्रकरणी जिल्ह्यातील ११ तालुक्यातील न्यायालयीन कामकाज बुधवारी बंद ठेवण्यात आले.

बीड जिल्हा न्यायालयात प्रॅक्टिस करणारे अॅड राम डोंगरे हे आपले कामकाज करत बसले असताना दुपारीच बारा ते साडेबारा वाजण्याच्या सुमारास राधाकिसन करपे आणि तीन चार महिला आणि पुरुष त्यांच्याकडे आले. या लोकांनी अचानक बाचाबाची आणि शिवीगाळ करत वकील डोंगरे यांना मारहाण करण्यास सुरवात केली. या घटनेच्या निषेधार्थ बुधवारी ११ तालुक्याचे न्यायालयीन कामकाज बंद राहणार आहेत. असे आवाहन वकील संघटनांच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

# अवकाळी पावसामुळे झालेल्या पिकांचे नुकसान त्वरित पंचनामे करून मदत करा -परमेश्वर वैद्य

**घाटनांदुर । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील आनंदवाडी शिवारात अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील पिकाचे प्रचंड मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याचे नुकसान झाले असून प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत करा अशी मागणी परमेश्वर मुंजा वैद्य यांनी केली आहे अवकाळी पावसाने हाता तोंडाशी आलेल्या रब्बी हंगामातील ज्वारी, गहू,हरभरा पिकाचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले असून त्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे २३ फेब्रुवारी सोमवार रोजी दुपारपासून आलेल्या अवकाळी पावसाने परळी व परळी तालुक्यातील



आनंदवाडी शिवारातील शेतकऱ्याचे अवकाळी पाऊस बेमाप वाऱ्यामुळे हाता तोंडाशी आलेले ज्वारी, गहू,हरभरा हे पिके भोई सपाट होय पिकांची मोठे प्रमाणात नुकसान झाले आहेत प्रशासनाने नुकसान झालेल्या पिकांचे लवकरात लवकर पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी परमेश्वर वैद्य यांनी लाडझरी सज्जाचे मंडळअधिकारी पल्लीवाड मॅडम व तलाठी भताने यांच्याकडे दूरध्वनीद्वारे केली आहे.

# माजलगाव-तेलगाव बसस्थानकांमध्ये महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर

माजलगाव । प्रतिनिधी

येथील सार्वजनिक वाहतुकीत महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद यांच्या वतीने माजलगाव व तेलगाव बस स्थानकांची पाहणी करण्यात आली. या पाहणीत अनेक गंभीर त्रुटी समोर आल्याने संबंधित प्रशासनाला तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात आगार प्रमुख, माजलगाव यांना सविस्तर निवेदन देण्यात आले आहे.

पाहणीदरम्यान बस स्थानक



परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याचे आढळून आले. तसेच सुरक्षारक्षक व पोलीस बंदोबस्ताचा अभाव असल्यामुळे महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. बस स्थानकातील पोलीस चौकीची अवस्था अत्यंत दयनीय असून तिचा वापर वॉशरूम म्हणून होत असल्याचेही निदर्शनास

### स्त्री मुक्ती परिषदेची पाहणी, प्रशासनाला निवेदन

आले.महिलांसाठी अत्यावश्यक असलेला 'हिरकणी कक्ष' उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले.आपत्कालीन परिस्थितीत मदतीची अडचण निर्माण होत असल्याचे परिषदेकडून सांगण्यात आले. याशिवाय महिला हेल्पलाईन क्रमांकाचा फलक नसल्यामुळे महिलांना तातडीने संपर्क साधता येत नाही, अशीही तक्रार

पान ३ वर

# धार्मिक स्थळाकडे जाणाऱ्या रस्त्याला लागली आग; नगर पालिकेला कशी जाग येईना?

### प्रदूषणमुक्त एम आय डी सी मध्ये मंदिर प्रदूषणयुक्त कधी झाली कळलंचं नाही

**बीड । प्रतिनिधी**

शहरात प्रदूषणमुक्त म्हणून ओळख असलेल्या परिसरात धक्कादायक वास्तव समोर आले असून, धार्मिक व ऐतिहासिक स्थळांकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यालाच नगरपालिकेने प्रत्यक्षात डम्पिंग ग्राउंडमध्ये रूपांतरित केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. हा रस्ता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.)



क्षेत्रातून जात असून, तोच मार्ग खंडोबा दीपमाळ व श्री खंडेश्वरी मंदिर या बीडच्या ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटन स्थळांकडे जाणारा आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, नगरपालिकेचे कर्मचारी पहाटे गुपचूप या रस्त्यावरच कचरा टाकून जातात, त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, थर्माकोल व ज्वलनशील कचरा साचतो. याच कचऱ्याला आग लागून परिसर धुराच्या विळख्यात सापडला आहे. आगीतून निघणारा विषारी धूर थेट रहिवाशी भागात शिरत असून नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

लहान मुले, वृद्ध व आजारी व्यक्तींना श्वसनाचा त्रास, डोळ्यांची जळजळ व डोकेदुखी यांसारख्या तक्रारी वाढत आहेत. भाविक व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असलेल्या या रस्त्यावरच कचरा टाकला जात असल्याने अपघाताचा धोका देखील वाढला आहे.

एम.आय.डी.सी. क्षेत्र, रहिवाशी वसाहत आणि ऐतिहासिक-धार्मिक मार्ग अशा अत्यंत संवेदनशील ठिकाणी रस्त्यालाच डम्पिंग ग्राउंड बनवणे ही

पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# 'महारेरा'चा पुण्यात दणका, मुदतीत सदनिका न देणाऱ्या बिल्डरांकडून १४६ कोटी रुपये वसूल करणार

पुणे : बांधकाम व्यावसायिक आणि विकासक यांच्याविरुद्ध महारेराने दिलेल्या आदेशानुसार कारवाई करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. अशा १८६ प्रकरणांमध्ये १४६ कोटी रुपये येत्या दोन महिन्यात वसूल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांना दिले आहेत.




याबाबत बोलताना डुडी म्हणाले, गेल्या दहा महिन्यात प्रशासनाने ११८ प्रकरणात १०२ कोटी रुपये वसूल केले आहेत. आता १८६ प्रकरणे प्रलंबित असून २० एप्रिल पर्यंत त्यांच्यावर कारवाई करण्याची सूचना देण्यात आल्या आहेत. रक्कम न मिळाल्यास सदनिकांचा लिलाव करून वसुली करण्यात येईल. अनेक प्रकरणे ही जुनी आहेत . त्याबाबत नोटिसा देण्यात आल्या , मात्र कारवाई झाली नाही. काही प्रकरणे चार-पाच वर्षांपूर्वीची आहेत. त्यामुळे, सदनिका खरेदीसाठी नोंदविलेल्या ग्राहकांचे मोठे नुकसान होते. याची दखल घेत, सर्व प्रकरणात कारवाई करून रक्कम वसूल करण्यास प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांना सूचना दिल्या आहेत, असे डुडी यांनी सांगितले.

महारेरा पुणे आणि मुंबई यांच्या आदेशानुसार मार्च २०२५ पर्यंतची २४६ प्रकरणे होती. त्यांची वसुलीची रक्कम १९५ कोटी रुपये होती. त्यानंतर जानेवारी २०२६ पर्यंत ५९ प्रकरणात नवीन आदेश होऊन आणखी ५३ कोटी रुपये वसूल करण्यास महारेराने सांगितले. या प्रकरणांपैकी ११८ प्रकरणांमध्ये गेल्या दहा महिन्यात वसुली करण्यात आली. पुणे शहर , पिंपरी चिंचवड आणि हवेली तालुक्यातील म्हणजे दोन्ही मनपालगतच्या भागातील प्रकरणे अधिक आहेत. प्रलंबित १८६ प्रकरणांपैकी हवेली तालुक्यातील ७९ प्रकरणे असून, तेथे ५२ कोटी रुपये वसूल करावयाचे आहेत. पिंपरी चिंचवड मधील ३५ प्रकरणांमध्ये १०.७९ कोटी रुपये वसूल करावयाचे आहेत. पुणे शहरातील १७ प्रकरणांमध्ये वसुलीची रक्कम ४३ कोटी रुपये आहे. लोणी काळभोर भागातील २३, तर मुळशी तालुक्यातील १४ प्रकरणे आहेत. खेड, मावळ , शिरूर आणि पुरंदर भागातील अन्य १८ प्रकरणे आहेत. तेथे एकूण १९ कोटी रुपये वसूल करावयाचे आहेत.

एकूण १०२ कोटी रुपयांची वसुली गेल्या दहा महिन्यात जानेवारीपर्यंत ११८ प्रकरणांमध्ये १०२ कोटी रुपये वसूल करण्यात आले. हवेली तालुका आणि पुणे शहरात मोठी वसुली करण्यात आली. हवेलीतील ५१ प्रकरणात ५९ कोटी रुपये, तर पुणे शहरातील ३१ प्रकरणात १९ कोटी रुपये वसूल करण्यात आले. मुळशीतील १४ प्रकरणात ८.६२ कोटी रुपये , पिंपरी चिंचवड मधील १३ प्रकरणात ६.८१ कोटी रुपये , तर लोणी काळभोरच्या पाच प्रकरणात सहा कोटी रुपये वसूल करण्यात आले.

# राजकारण शुद्ध करण्यासाठी युवकांनी पुढे यावे: अनुराग ठाकूर

**पुणे । प्रतिनिधी**

धोरणनिर्मिती, प्रशासन आणि सार्वजनिक सेवेतील गुंतागुंत समजून तरुणांनी राजकीयदृष्ट्या कुशल, प्रशासन जाणकार आणि सामाजिक दृष्ट्या संवेदनशील बनविण्यासाठी कॅम्पसमधूनच एक नवी पिढी निर्माण होऊ शकते. राजकारणाला शुद्ध करण्यासाठी नवीन आणि सक्षम प्रतिभावान युवकांनी राजकारणात प्रवेश करावा, असे आवाहन लोकसभा खासदार व माजी केंद्रीय मंत्री अनुरागसिंह ठाकूर यांनी केले.



एमआयटीतर्फे १५ व्या भारतीय छात्र संसदेच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी माजी खासदार व ज्येष्ठ पत्रकार शाहिद सिद्दीकी आणि राज्यसभा खासदार डॉ. संदीप कुमार पाठक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्यकारी अध्यक्ष आणि छात्र संसदेचे संस्थापक डॉ. राहुल विश्वनाथ कराड, कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस आणि सीएओ डॉ. प्रसाद खांडेकर उपस्थित होते.

ठाकूर म्हणाले, लोकशाही, नेतृत्व आणि सार्वजनिक धोरण याबरोबरच केवळ एआय नैतिकतेची उपेक्षा करू शकत नाही. २१ व्या शतकात कॅम्पसमधून कॅबिनेटमध्ये जाण्याचा विचार करत असाल, तर एआय नैतिकतेशी जुळवून घेतले पाहिजे. गेल्या १० वर्षांमध्ये शिक्षण क्षेत्रात आमूलाग्रा बदल घडला आहे. यामध्ये आयआयटी, आयएमएम, कॉलेज, युनिव्हर्सिटी यांच्या संख्येत वृद्धी झाली आहे. आत्मनिर्भर भारतासाठी सेमी कंडक्टर, हेल्थकेअर व अन्य क्षेत्रातील अतुलनीय वृद्धी होत आहे. कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस यांनी स्वागतपर भाषण केले. प्रा. डॉ. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले. शाहिद सिद्दीकी म्हणाले, विश्वगुरू बनण्यासाठी युवकांनी स्वतःला सशक्त बनवा. तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्तेवर अवलंबून राहू नये. युवकांनी केलेल्या आंदोलनामुळेच या देशात परिवर्तनाची लाट आली आहे. त्यात जेपी मूहमेंटसारख्या अनेक चळवळीचा सहभाग आहे. युवकांनी जाती-पातीच्या भिंती तोडून देशविकासासाठी कार्य करावे. देशाला बदलायचे असेल तर सर्वात प्रथम युवकांनी मानसिकता बदलावी.

# जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर १२ तास वाहतूक कोंडी

पुणे । प्रतिनिधी

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर जलद वाहतुकीसाठी उभारण्यात आलेल्या ग्रेड सेपरेटरमुळेच पिंपरीतील मोरवाडी येथे तब्बल १२ तासांची वाहतूक कोंडी निर्माण झाली. पहाटे साडेचारच्या सुमारास एक मालवाहू कंटेनर ग्रेड सेपरेटरमध्ये अडकल्याने सकाळपासून केवळ एकच लेन सुरू होती. सायंकाळी साडेचारपर्यंत प्रयत्नांनंतर अखेर कंटेनर हटवण्यात पोलिसांना यश आले.



पिंपरी-चिंचवड महापालिकेने आकुर्डी, चिंचवड आणि पिंपरी येथे वाहतूक सुरळीत आणि जलदगतीने व्हावी, यासाठी ग्रेड सेपरेटर उभारले आहेत. मात्र सेपरेटरची उंची आणि जड वाहनांच्या उंचीतील तफावत याकडे पुरेसे लक्ष न दिल्याने यापूर्वीही कंटेनर अडकण्याच्या घटना घडल्या आहेत. मंगळवारी घडलेली घटना त्याच मालिकेतील आणखी एक प्रकार ठरली.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कंटेनर चालकाने पहाटे साडेचार वाजताच्या सुमारास मोरवाडी येथील ग्रेड सेपरेटरमध्ये प्रवेश केला. सुरुवातीला वाहन आत गेले; मात्र मध्यभागी पोहोचताच कंटेनर छताला अडकला आणि पूर्णपणे थांबला. वाहन मागे घेणे किंवा पुढे सरकवणे अशक्य झाल्याने परिस्थिती गंभीर बनली.


वाहतूक पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. कंटेनर बाहेर काढण्यासाठी प्रथम मागील चाकांमधील हवा सोडण्यात आली, जेणेकरून वाहनाची उंची काही प्रमाणात कमी होईल. त्यानंतर क्रेनच्या सहाय्याने कंटेनर ओढून बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र कंटेनर ग्रेडसेपरटेरमधून बाहेर आल्यावर काढलेली चाकातील हवा भरण्यासाठी मागील चाकांना जॅक लावण्यात आला. मात्र जॅक अडकून पडल्याने कामात आणखी विलंब झाला. जॅक काढण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ व साधनसामग्री बोलवावी लागली. त्यामुळे पहाटेपासून सुरू झालेली कोंडी दुपारपर्यंत कायम राहिली.

दरम्यान, सकाळी कार्यालयीन वेळ सुरू होताच वाहनांच्या रांगा वाढत गेल्या. दुचाकीस्वार, चारचाकी चालक, बस प्रवासी आणि शालेय विद्यार्थी वाहतूक कोंडीत अडकले. अनेकांना कामावर व शाळेत पोहोचण्यास उशीर झाला. काही वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा अवलंब केला; मात्र त्याठिकाणीही मोठी कोंडी झाल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली.सुमारे १२ तासांच्या प्रयत्नांनंतर सायंकाळी साडेचारच्या सुमारास कंटेनर हटवण्यात यश आले आणि वाहतूक हळूहळू सुरळीत झाली. मात्र या घटनेने नागरिकांचा संयम सुटला असून भविष्यात अशी वेळ येऊ नये यासाठी महापालिकेने तातडीने तांत्रिक पाहणी करून आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

# राज्यमंत्र्यांनी मागितला पालिकेकडे खुलासा; पर्वती मतदारसंघ निधी प्रस्तावावरून वाद

**पुणे । प्रतिनिधी**

पर्वती विधानसभा मतदारसंघात पथ विभागामार्फत करण्यात येणाऱ्या विविध विकास कामांसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७२ (ब) अन्वये निधी तरतुदीच्या प्रस्तावावरून महापालिका आणि नगरविकास राज्यमंत्री तसेच पर्वतीच्या आमदार माधुरी मिसाळ यांच्यात वाद निर्माण झाला आहे.



प्रस्ताव सर्वसाधारण सभेतून मागे घेतल्याबाबत आमदार मिसाळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून कोणत्या कारणास्तव हा प्रस्ताव मागे घेतला त्याचा खुलासा करण्याचे आदेश प्रशासनास दिले आहेत. तसेच, या निर्णयामुळे आपल्या प्रतिमेस धक्का पोहचल्याचेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

मिसाळ यांनी प्रशासनास दिलेल्या प्रस्तावानुसार, मतदारसंघातील २१ विकास कामांसाठी कामे पूर्ण होईपर्यंत ३२.८३ कोटींची निधी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने ६ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या बैठकीत मंजूर करून मुख्य सभेकडे पाठवला होता. हा प्रस्ताव १८ फेब्रुवारीच्या सभेसमोर मंजुरीसाठी ठेवण्यात येणार होता. मात्र सभेच्या आदल्या दिवशी तो कार्यपत्रिकेतून मागे घेण्यात आला.

मुख्यसभेतही त्यावर काहीच चर्चा न करता सत्ताधारी भाजपनेही तो मागे घेण्यास एक प्रकारे मुक संमती दिली. त्याची दखल आता नाराज झालेल्या आमदार मिसाळ यांनी घेतली आहे. त्याबाबत, प्रशासनास दिलेल्या पत्रात कलम ७२ (ब) अन्वये दोन प्रस्ताव मंजुरीस असताना केवळ आपल्या मतदारसंघाशी संबंधित प्रस्तावच मागे का घेण्यात आला, तो कोणत्या कायदेशीर तरतुदीनुसार मागे घेतला, तसेच संबंधित लोकप्रतिनिधीशी चर्चा न करता निर्णय घेणे योग्य नसल्याचे नमूद केले आहे.

तसेच प्रस्ताव मागे घेण्यामागे तांत्रिक व प्रशासकीय दुरुस्त्या आवश्यक असल्याचे प्रशासनाने पत्रात नमूद केले असले तरी त्या नेमक्या कोणत्या होत्या, याबाबत सविस्तर माहिती देण्याची मागणी केली आहे. याशिवाय, सभागृह कामकाज नियमावलीनुसार प्रस्ताव मागे घेणे नियमबाह्य असल्याचा दावा करत या विषयासंदर्भातील वस्तुस्थिती दर्शक अहवाल तात्काळ सादर करण्याच्या सूचना मिसाळ यांनी केल्या आहेत. या पत्राची एक प्रत सभागृहनेते गणेश बिडकर यांनाही देण्यात आली आहे.

# बैठका, पाच वेळा पाहणी करूनही कामे नाहीत; लोहगावातील मुख्य रस्त्यांबाबत आ. पठारे यांचा आंदोलनाचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

लोहगावमधील डी. वाय. पाटील रस्ता, लोहगाव-निरगुडी रस्ता, लोहगाव-वाघोली ते काळभोर वस्ती रस्ता, माळवाडी रस्ता, पठारे वस्ती रस्ता तसेच पवार वस्ती रस्ता ही कामे अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत.



या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांसोबत अनेक बैठका तसेच पाच वेळा प्रत्यक्ष स्थळ पाहणी करूनही ठोस कार्यवाही झालेली नाही, येत्या आठ दिवसांत या रस्त्यांची कामे सुरू झाली नाहीत तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आमदार बापूसाहेब पठारे यांनी दिला आहे.

लोहगावमधील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याच्या कामांसंदर्भात आमदार पठारे यांनी अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर यांना निवेदन देत नाराजी व्यक्त केली आहे. ड्रेनेज व पिण्याच्या पाण्याच्या लाइनची कामे पूर्ण होण्यापूर्वीच रस्त्यांची कामे सुरू करण्यात आली. ही बाब संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर सदर कामे पूर्ण करण्यात आली असली, तरीही रस्त्यांचे काम अद्याप सुरू झालेले नाही. वारंवार पाठपुरावा करूनही विभागाकडून विविध कारणे देत कामास विलंब केला जात आहे. संबंधित ठेकेदाराकडूनही कोणतीही ठोस कार्यवाही होताना दिसत नाही, असे आमदार पठारे यांनी निवदेनात म्हटले आहे. खराब रस्ते, उडणारी धूळ आणि वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. येत्या काही दिवसांत लोहगावची यात्रा होणार असल्याने परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. या सर्व बाबींचा विचार करून पुढील आठ दिवसांत कामे प्रत्यक्ष सुरू करावीत, अन्यथा नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आमदार पठारे यांनी दिला आहे.

# बार कौन्सिलच्या अर्ज भरण्यास दीड लाख लागणार

पुणे । प्रतिनिधी

राज्य वकील परिषदेच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्यास सुरूवात झाली असून इच्छुक उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी तब्बल दीड लाख मोजावे लागणार आहे. अर्ज, अनामत रक्कम तसेच मतदार यादीसाठीच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे राज्यातील वकिलांची शिखर संघटना असलेल्या परिषदेची निवडणूक ही गुणवंत तसेच अनुभवी वकिलांची आहे की आर्थिकदृष्ट्या संपन्न वकीलांची असा प्रश्न वकील उपस्थित करत आहेत.




बार परिषदेसाठी २४ मार्च रोजी मतदान असून त्याची अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. अर्ज सादर करताना उमेदवारांना तब्बल सव्वा लाख अनामत रक्कम जमा करावी लागणार आहे. विशेष म्हणजे ही रक्कम निवडणूक संपल्यानंतर परत मिळणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. मागील निवडणुकीवेळी ही रक्कम २५ हजार रुपये होती. गत निवडणुकांच्या तुलनेत ही वाढ लक्षणीय असल्याने अनेक इच्छुकांनी उमेदवारीबाबत पुनर्विचार सुरू केला आहे.

याखेरीज एकपानी उमेदवारी अर्जासाठी तीन हजार शुल्क आकारण्यात येत आहे. मतदार यादीसाठी दहा हजार वेगळे मोजावे लागणार आहेत. मुंबईला अर्ज भरण्यासाठी जावे लागणार असून अर्ज, अनामत रक्कम आणि मतदार यादी, प्रवास खर्च मिळून जवळपास दीड लाखांचा खर्च उमेदवाराला सहन करावा लागणार आहे. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मतदारांशी संपर्क, बैठका, प्रवास, निवास, प्रचार साहित्य, डिजिटल मोहीम, बॅनर-पोस्टर आदी खर्च गृहीत धरला तर खर्च आणखी वाढणार आहे.

# मावळ तालुका वारकरी मंडळाची नूतन कार्यकारिणी जाहीर

मावळ । प्रतिनिधी

मावळ तालुका वारकरी मंडळाची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. मंडळाचे अध्यक्ष हभप विठ्ठल महाराज पांडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि जेष्ठ विधिज्ञ ड खंडूजी तिकोणे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री घटेश्वर मंदिर, महागाव येथे ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.



मावळ तालुका वारकरी मंडळाच्या अध्यक्षांचे अकाली निधन झाल्याने काही दिवसांपूर्वी रामायणाचार्य हभप विठ्ठल महाराज पांडे यांची मंडळाचे प्र. अध्यक्ष म्हणुन एकमताने निवड करण्यात आली होती. त्यानंतर झालेल्या मासिक मिटींगमधे अध्यक्ष पांडे महाराज, संघटक दिनकर निंबळे आणि संस्थापक नारायण केंडे यांनी नवीन कार्यकारिणीची निवड केली.

महागाव येथील श्री घटेश्वर मंदिरात पंचक्रोशीतील वारकरी आणि स्थानिक ग्रामस्थांच्या उपस्थितीत ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. ती पुढीलप्रमाणे; हभप भानुदास शिंदे, अनंता गो. कालेकर (उपाध्यक्ष), श्री ज्ञानदेव दहिभाते (सचिव), संजय घाडगे (सहसचिव), प्रकाश होजगे (कार्याध्यक्ष), बाळासाहेब वाघोले (सहकार्याध्यक्ष), हभप बाळासाहेब वरघडे (कोषाध्यक्ष),प्रल्हाद कालेकर(सहकोषाध्यक्ष) रघुनाथ आढाव( वारकरी शिक्षण समिती .प्रमुख) माऊली कंधारे( युवा समिती प्रमुख), श्री दत्तु राऊत(यात्रा कमिटी प्रमुख) बाळकृष्ण तुपे(यात्रा क.उपप्रमुख), अनंता दळवी(संपर्क प्रमुख) सदर कार्यक्रमाचे आयोजन माऊली कंधारे, प्रकाश होजगे यांनी केले होते. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते.

# पुण्यात पावसाळ्यापूर्व आपत्ती व्यवस्थापनाची तयारी

पुणे । प्रतिनिधी

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण शहरासह नव्याने समाविष्ट गावांचे सूक्ष्म नियोजन करून आपत्ती व्यवस्थापनाची भक्कम तयारी करावी, असे स्पष्ट आदेश महापौर मंजूषा नागपुरे यांनी प्रशासनाला दिले. आपत्ती निवारणासाठी प्रभागस्तरावर स्वतंत्र टीम तयार करावी, तसेच पावसाळापूर्व कामांबाबत सर्व संबंधित यंत्रणांची तातडीने संयुक्त बैठक घेण्याचे निर्देश त्यांनी मंगळवारी दिले.

मंगळवारी झालेल्या आढावा बैठकीत स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, विरोधी पक्षनेते ड. नीलेश निकम, आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी., पवनीत कौर, ओमप्रकाश दिवटे, उपायुक्त माधव जगताप तसेच अधिकारी उपस्थित होते. महापौरांनी स्पष्ट केले की, पावसाळ्यापूर्व कामांमध्ये महापालिका, जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महामेट्रो, महावितरण, पीएमआरडीए, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचा समन्वय अत्यावश्यक आहे. ओढे-नाल्यांची सफाई, कल्व्हर्टची दुरुस्ती, रिटेनिंग वॉलची मजबुतीकरणाची कामे वेळेपूर्वी पूर्ण करावीत.

आवश्यक असल्यास पावसाळी वाहिन्यांच्या आराखड्यात सुधारणा करावी आणि नाल्यांचे संपूर्ण मॅपिंग पूर्ण करावे. धोकादायक वाडे व इमारतींचे सर्वेक्षण करून नोटिसा द्याव्यात, तसेच झाडांच्या धोकादायक फांद्या तातडीने छाटाव्यात, अशा सूचनाही त्यांनी केल्या. विरोधी पक्षनेते नीलेश निकम यांनी पावसाळी वाहिन्या शक्यतो पदपथांच्या खालून टाकण्याचा सल्ला दिला, जेणेकरून रस्त्यांची वारंवार तोडफोड टळेल.

## एका ठेकेदाराला तीनच कामे

पावसाळापूर्व कामांच्या दर्जाबाबत वारंवार तक्रारी येत असल्याने यंदा गुणवत्ता राखण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. अनेकदा निविदा पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी दराने मंजूर केल्या जात असल्याने कामांचा दर्जा घसरतो, अशी नोंद बैठकीत झाली. या पार्श्वभूमीवर, एका ठेकेदाराला जास्तीत जास्त तीनच कामे देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली. यामुळे ठेकेदारांवरील ताण कमी होईल आणि कामांचा दर्जा सुधारेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# भिगवण प्रकरणात सर्वात मोठा ट्विस्ट, तरुणीनं घेतला यू टर्न

बारामती । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील भिगवण प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. भिगवण अपहरणात प्रकरणातील तरुणीने इंदापूर अतिरिक्त सत्र न्यायालयासमोर आपल्याला आईकडे आणि मामाकडे जाण्याची इच्छा व्यक्त केली आहे. २० फेब्रुवारी रोजी बारामती सत्र न्यायालयासमोर या तरुणीने आपण आईसोबत जाणार नसून जहीर शेख सोबतच जाणार असल्याचं म्हटलं होतं. मात्र, त्यानंतर आज इंदापूर अतिरिक्त सत्र न्यायालयात व्हीसीद्वारे या प्रकरणातील सुनावणी पार पडली. पुन्हा आज इंदापूर अतिरिक्त सत्र न्यायालयाने संबंधित तरुणीला व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे काही प्रश्न विचारले. यावेळी संबंधित तरुणीने आई आणि मामा सोबत जाण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

मुलीची आई बारामती पोलीस स्टेशनला आली होती. मात्र, मुलगी आई सोबत जाण्यास तयार नव्हती. त्यामुळे भिगवण घटनेतील मुलीला महिला पुनर्वसन केंद्रात तिची रवानगी करण्यात आली होती. सुधारगृहात पाच दिवस राहिल्यानंतर आज इंदापूर कोर्टात सुनावणी झाली. त्यावेळी कोर्टाने मुलीला कोणाकडे जायचे असे विचारले असता मुलीने आई आणि मामाकडे




जाण्याची इच्छा व्यक्त केली. संबंधित तरुणीने एक प्रतिज्ञापत्र तयार केलं आहे. या प्रतिज्ञापत्रात माझं आणि त्याचं प्रेम होतं. मी हे घरच्यांना सांगितलं होतं. दुसऱ्या मुलांसोबत लग्नास माझा विरोध होता. त्यामुळे संबंधित मुलासोबत मी स्वमर्जीने पळून गेलो, असं म्हटलं आहे. तसेच मिरचीपूड फेकल्याची जो गुन्हा दाखल केला आहे. तो खोटा असल्याचंही तरुणीने प्रतिज्ञापत्रात सांगितलं आहे. दरम्यान, मुलगा आणि मुलगी भिगवममधून बाहेर पडल्यानंतर श्रीगोंदा, अहिल्यानगर, शिक्रापूर, पुणे सासवड असा प्रवास करून महाबळेश्वरला गेले. महाबळेश्वरवरून मुलगी आणि मुलगा मध्यरात्री दीड वाजता बारामती शहर पोलीस ठाण्यात हजर झाले होते. भिगवण घटनेतील मुलीला सुधार गृहात तिची रवानगी करण्यात आली आहे. तर मुलाबाबत चौकशी करून पुढचा निर्णय घेतला जाईल, अशी माहिती पोलीस सूत्रांकडून देण्यात आली आहे. इंदापूर तालुक्यातील भिगवण घटनेतील युवतीला आज कोर्टात हजर केल्यानंतर तिचा जबाब नोंदवला गेला. जबाब नोंदवल्यानंतर मुलीचे मेडिकल करून पुनर्वसन केंद्रात तिची रवानगी करण्यात आली. तर मुलाबाबत चौकशी करून पुढचा निर्णय घेतला जाईल, अशी माहिती पोलीस सूत्रांकडून देण्यात आली आहे.